# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२१

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ०५ मार्च, २०२१ / फाल्गुन १४, १९४२ ( शके )**

**(१) गृह मंत्री**
**(२) महसूल मंत्री**
**(३) पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री**
**(४) कृषी, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री**
**(५) रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री**
**(६) वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४८**

---

## पिंपरी चिंचवड (जि.पुणे) पोलीस आयुक्तालयाच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने मेफेड्रोन ड्रग्स जप्त केल्याबाबत

**(१) * २११८३ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड (जि.पुणे) पोलीस आयुक्तालयाच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने सुमारे २० कोटी रुपयांचे मेफेड्रोन ड्रग्स जप्त करून पाच दोषींना अटक केली असून तपासामध्ये आरोपींनी रांजणगाव येथील बंद असलेल्या कंपनीमध्ये ड्रग्स बनविण्याचा कारखाना सुरु केल्याचे दिनांक १० जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कारखान्यात एकूण १३२ कोटी रुपये किंमतीचे १३२ किलो ड्रग्स बनवून त्यातील ११२ किलो ड्रग्स विकल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये अंमली पदार्थ संबंधी दाखल गुन्ह्यांमधील २२ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. तसेच गुन्ह्याचा तपास सुरु असून तपासाअंती मिळुन येणाऱ्या अधिक आरोपींना अटक करण्याची तजवीज पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाने ठेवली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद जिल्हयातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विम्याची नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(२) * २३९५७ श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयात माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या खरीप पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांनी नुकसान भरपाईकरिता संबंधित विमा कंपनीकडे अर्ज केले असता फक्त ४८,४४२ शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांनी ९,४१,९९० अर्जाद्वारे ४०० कोटी रुपयांचा पीक विम्याचा हप्ता भरुन सन २०२० च्या खरीप हंगामामध्ये सुमारे ५,१८,००० हे. क्षेत्र पिकाकरीता विमा संरक्षित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पिकांचे नुकसान झाल्याबाबतची तक्रार शेतकऱ्यांनी ७२ तासांच्या आत ऑनलाईन पध्दतीने वैयक्तिकरित्या करणे बंधनकारक असल्यामुळे लाखो शेतकरी पीक विम्याच्या नुकसान भरपाईपासून वंचित राहिले असल्याने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी पीक विम्याची रक्कम मिळण्यासाठी दिनांक १५ फेब्रुवारी, २०२१ रोजी पासून साखळी धरणे आंदोलन करण्याचा निर्धार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे, तद्नुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना संबंधित कंपनीकडून विम्याची रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

खरीप हंगाम २०२० मध्ये उस्मानाबाद जिल्हयात प्रधानमंत्री पीक विमा योजनेची अंमलबजावणी बजाज अलियांन्झ जनरल इ. कंपनीमार्फत करण्यात आली. जिल्हयातील ९.५१ लाख शेतकऱ्यांनी रक्कम रु. ४१.९७ कोटी विमा हप्ता भरुन ५.१९ लाख हे. क्षेत्र पिकाकरीता विमा संरक्षित केले आहे. योजनेतंर्गत स्थानिक नैसर्गिक आपत्ती झालेले नुकसान या बाबी अंतर्गत एकूण ४९४९६ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम रु. ४९.९४ कोटी विमा कंपनीमार्फत वाटप करण्यात आले असून काढणी पश्चात नुकसान भरपाई या बाबीअंतर्गत २२,३३० शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम रु. ३७.०२ कोटी निश्चित करण्यात आली असून वाटपाची कार्यवाही सुरु आहे. तसेच उत्पन्नावर आधारित नुकसान भरपाई परिगणनेची कार्यवाही विमा कंपनीस्तरावर सुरु आहे.

(४) दिनांक १५.२.२०२१ पासून साखळी धरणे आंदोलन करणार असल्याबाबतचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(५) योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार विमा संरक्षण घेतलेल्या शेतकऱ्यांनी बाधीत क्षेत्राबाबत घटना घडल्यापासून ७२ तासांच्या आत संबंधित विमा कंपनीस कळविणे आवश्यक आहे. तथापी योजनेच्या अंमलबजावणी बाबत आयोजित आढावा बैठकीमध्ये वेळोवेळी उशिरा दिलेल्या पुर्व सुचनेबाबत सर्वेक्षण करुन

नुकसान भरपाई वाटपाबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित विमा कंपनीला देण्यात आले आहेत व त्यानुसार विमा कंपनीमार्फत कार्यवाही करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वांद्रे-पश्चिम (मुंबई) ज्ञानेश्वरनगर येथे सात नवजात बालकांची विक्री केल्याबाबत**

**(३) * २२५४८ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे-पश्चिम (मुंबई) ज्ञानेश्वरनगर येथे सात नवजात बालकांची विक्री केल्याची घटना माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणातील टोळीमध्ये महिला व पुरुष यांच्यासह वैद्‌यकीय अधिकारी यांचाही समावेश असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) होय.

(२) होय, सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये एकूण ७ महिला, १ महिला डॉक्टर व १ पुरुष डॉक्टर यांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना अटक करण्यात आलेली आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी गु.प्र.शा., गु.र.क्र. १३/२०२१, कलम ३७०(४), ३४ भादंवि सह कलम ८१ बाल न्याय अधिनियम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आंबोली (ता.डहाणू,जि.पालघर) येथील संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला आदिवासी शेतकऱ्यांना मिळण्याबाबत

**(४) * २४६०० श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबोली (ता.डहाणू, जि.पालघर) येथील महामार्ग क्र. ८ करिता संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला आदिवासी शेतकऱ्यांना मिळाला नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी शेतकऱ्यांना उक्त जमिनीचा मोबदला तात्काळ मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.महसूल मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) हे खरे नाही.

आंबोली येथील महामार्ग क्र.८ करिता संपादित जमिनीसाठी निवाडा दिनांक १८.०७.१९५८ रोजी जाहिर करण्यात आला असून निवाडयाप्रमाणे मोबदला रक्कम सर्व संबंधित खातेदारांना दिनांक १८.०८.१९५८ रोजी वाटप करण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) मौजे आंबोली येथील भूसंपादनाखालील जमिनीचा मोबदला यापूर्वीच संबंधित सर्व खातेदारांना वाटप करण्यात आला आहे. प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हयात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम अदा करण्याबाबत

**(५) * २३६५९ श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे साधारणपणे ४,२७१ शेतकऱ्यांच्या शेत जमिनीचे नुकसान झाले असून खरडून गेलेल्या शेतजमिनीपैकी जवळपास ९०० शेतकऱ्यांच्या शेतातील नुकसानीचे पंचनामे कृषी विभागाच्या सहाय्याने पीक विमा कंपनीने करुनही अद्याप ३,००० पंचनामे प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेहकर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या खरीप पिकांचे अतिवृष्टी, पुराचे पाणी आदि कारणांमुळे नुकसान झाले असून पीक विमा असलेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करुनही नुकसान भरपाई देण्यास नकार देणाऱ्या संबंधित पीक विमा कंपनीच्या विरोधात शेतकऱ्यांनी रिलायन्स कंपनीचे प्रतिनिधी व तालुका कृषी अधिकारी यांना दिनांक १० डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास घेराव घातला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, बुलढाणा जिल्हयातील शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करुन पीक विम्याची रक्कम संबंधितांना तातडीने अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

खरीप हंगाम २०२० मध्ये बुलढाणा जिल्हयात प्रधानमंत्री पीक विमा योजनेची अंमलबजावणी रिलायन्स जनरल इ. कंपनीमार्फत करण्यात आली. जिल्हयातील २.९५ लाख शेतकऱ्यांनी रक्कम रु.२२.०८ कोटी विमा हप्ता भरुन २.२६ लाख हे. क्षेत्र पिकाकरीता विमा संरक्षित केले आहे. योजनेतंर्गत स्थानिक नैसर्गिक आपत्ती झालेले नुकसान या बाबी अंतर्गत एकूण १४३४३ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम रु.१४.१६ कोटी विमा कंपनीमार्फत वाटप करण्यात आली

आहे व काढणी पश्चात नुकसान भरपाई या बाबीअंतर्गत १३१८ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम रु. ०.९० कोटी निश्चित करण्यात आली असून वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

तसेच विमा कंपनीकडून प्राप्त अंतरिम अहवालानुसार उत्पन्नावर आधारित (तूर, कापूस व कांदा वगळून) ८२८४ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम रु. १.२४ कोटी निश्चित करण्यात आली असून वाटपाची कार्यवाही विमा कंपनीस्तरावर सुरु आहे.

(२) हे खरे आहे.

पंचनाम्यातील नमूद बाधित क्षेत्राच्या प्रमाणात शेतकऱ्यांना विमा कंपनीमार्फत नुकसान भरपाई वाटप करण्यात आल्याने एकाच गावात समान प्रमाणात नुकसान भरपाईची रक्कम न मिळाल्याने गैरसमज झाल्याने तसेच पूर्वसूचना न दिलेल्या शेतकऱ्यांना विम्याची नुकसान भरपाई मिळावी, या मागणीसाठी तालुका कृषी अधिकारी, मेहकर कार्यालयात दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी घेराव घातला होता.

(३) खरीप हंगाम २०२० मध्ये मेहकर तालुक्यातील २७००१ शेतकऱ्यांनी रक्कम रु. १.८७ कोटी विमा हप्ता भरुन २०८१७ हे. क्षेत्र पिकाकरीता विमा संरक्षित केले आहे. योजनेतंर्गत स्थानिक नैसर्गिक आपत्ती झालेले नुकसान या बाबी अंतर्गत एकूण २७३३ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम रु. ३.६८ कोटी विमा कंपनीमार्फत वाटप करण्यात आली असून काढणी पश्चात नुकसान भरपाई या बाबीअंतर्गत ६० शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम रु. १.९३ लाख निश्चित करण्यात आली असून वाटपाची कार्यवाही सुरु आहे. तसेच विमा कंपनीकडून प्राप्त अंतरिम अहवालानुसार उत्पन्नावर आधारित (तूर, कापूस व कांदा वगळून) ४८० शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम रु. १५.३० लाख निश्चित करण्यात आली असून वाटपाची कार्यवाही विमा कंपनीस्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

# माझगांव (मुंबई) येथील गृहनिर्माण संस्थेस शासनाच्या ताब्यातील भूखंड पुनर्विकासाकरिता हस्तांतरित करण्याबाबत

**(६) * २३३३६ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माझगांव (मुंबई) महसूल विभागातील सन १९७२ मध्ये भाडेपट्टा संपुष्टात आलेल्या व शासनाच्या ताब्यात असलेला भूकर क्र. ३०९ मधील मिळकतीवरील बांधकामामध्ये मागील ७५-८० वर्षापासून भाडेकरु व रहिवाशी वास्तव्य करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ५० वर्षांपासून मालमत्तेची स्वखर्चाने देखभाल व दुरुस्ती करणाऱ्या भाडेपट्टाधारकांच्या 'अहमद बिल्डिंग भाडेकरु सहकारी गृहनिर्माण संस्थेस' शासनाने हस्तांतरित करण्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा.मुख्यमंत्री व महसूल मंत्री यांना दिनांक ३० सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास संस्थेतर्फे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच, अशाच प्रकारचा प्रस्ताव माझगांव महसुली विभागातील भूकर क्र. ३०२ व ३०४ मधील आंबेवाडी को.ऑप. हौसींग सोसायटी (नियोजित) या संस्थेतर्फे मा.मुख्यमंत्री व महसूल मंत्री यांना दिनांक १६ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास  मान्यतेसाठी सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक १२ डिसेंबर, २०१२ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार उक्त भूखंड गृहनिर्माण संस्थेस देखभाल दुरुस्ती व पुनर्विकासासाठी हस्तांतरित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) सदर प्रकरणी नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## मौजे डोंगरकडा (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील केळी उत्पादक शेतकऱ्यांना फळपिक विमा योजनेचा लाभ देण्याबाबत

**(७) * २११४४ श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे डोंगरकडा (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील केळी उत्पादक शेतकऱ्यांनी सन २०१९-२० मध्ये फळपिक विमा योजनेंतर्गत पीक विमा भरणा केलेला असताना मौजे वडगाव येथील स्वयंचलित हवामान केंद्राच्या चुकीच्या अहवालामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना विम्याचा लाभ मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शेतकरी व बागायतदार यांनी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, हिंगोली यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रारी केल्यानंतर स्वयंचलित हवामान केंद्राची पाहणी केली असता त्यात अनेक त्रुटी आढळून आल्या असून याबाबतचा सविस्तर अहवाल जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्याकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालातील निष्कर्षानुसार जिल्हाधिकारी यांनी डोंगरकडा येथील शेतकऱ्यांना फळपिक विमा मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त, कृषी आयुक्तालय, पुणे यांच्याकडे दिनांक २० नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, डोंगरकडा महसूल विभागातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना फळपिक विमा योजनेचा लाभ देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.कृषी मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने डोंगरकडा महसूल विभागातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना फळपिक विमा योजनेचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही. डोंगरकडा महसूल मंडळातील हवामान केंद्रावरील प्राप्त आकडेवारीवरून सदर महसूल मंडळात तापमान बाबतचा हवामान धोका लागू न झाल्याने, त्यानुसार नुकसान भरपाई देय होत नाही.

तथापि, सदर महसूल मंडळातील केळी उत्पादक शेतकऱ्यांना वेगाचा वारा या हवामान धोक्यामुळे झालेल्या नुकसानीकरिता नुकसान भरपाईची रक्कम नियमानुसार विमा कंपनीमार्फत अदा करण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे आहे.

(५) जिल्हा तक्रार निवारण समिती, हिंगोली यांनी डोंगरकडा महसूल मंडळातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना फळपिक विमा योजनेतंर्गत नियमाप्रमाणे लाभ देण्याबाबत आदेशित केले आहे. त्यानुसार संबंधित विमा कंपनीस सूचना देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## नाशिक व पुणे येथे बनावट नोटा चलनात आणणाऱ्या टोळीस पोलिसांनी अटक केल्याबाबत

**(८) * २२२७९ श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे २०० व ५०० रुपयांच्या साडेबारा हजार किंमतीच्या तसेच पुणे येथे ८७ कोटी रुपयांच्या बनावट नोटा चलनात आणणाऱ्या टोळीला दिनांक १६ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास पोलिसांनी अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बनावट नोटा चलनात आणणाऱ्या टोळीचा औरंगाबादपर्यंत संबंध असल्याचेही आढळून आले असून सदर बनावट नोटांची सत्यता पडताळणीकरिता या नोटा चलार्थ पत्र मुद्रणालय, नाशिक यांचेकडे पोलिसांनी पाठविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणातील अहवाल प्राप्त झाला आहे काय व त्यात काय नमूद करण्यात आले आहे, तसेच संबंधित टोळींमध्ये एकूण किती व्यक्तींचा समावेश होता व या दोन्ही टोळ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) होय.

(२) नाशिक येथे दाखल गुन्ह्यातील बनावट नोटा चलनात आणणाऱ्या टोळीचे औरंगाबादपर्यंत संबंध असल्याची माहिती तपासात निष्पन्न झालेली नाही. सदर नोटांची पडताळणी करणेकरिता नोटा मुख्य व्यवस्थापक, चलार्थ पत्र मुद्रणालय, नाशिक रोड यांच्याकडे पाठविण्यात आल्या होत्या.

पुणे येथे दाखल गुन्ह्यातील जप्त नोटा चिल्ड्रेन बँक ऑफ इंडीयाचे (खेळण्यातील) असल्याने ते पडताळणी करीता करन्सी प्रेस यांचेकडे पाठविण्यात आलेल्या नाहीत.

(३) नाशिक येथे २०० व ५०० रुपयांच्या साडेबारा हजार किंमतीच्या बनावट नोटा चलनात आणणाऱ्या टोळीतील आरोपींविरुध्द अंबड पोलीस स्टेशन, नाशिक शहर येथे दिनांक १४/०६/२०२० रोजी गु.र.नं ३५६/२०२० भा.दं.वि. कलम ४८९(ब), (क), ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून ८ आरोपींना अटक करण्यात आली होती. मा. न्यायालयाने जामीन मंजूर केल्याने ते सध्या जामीनावर आहेत.

नाशिक येथे दाखल गुन्ह्यातील जप्त नोटांबाबत चलार्थ पत्र मुद्रणालय, नाशिक रोड यांचेकडून नोटांच्या पडताळणीचा अहवाल दिनांक २०/०८/२०२० रोजी प्राप्त झाला आहे. सदर अहवालात गुन्हयातील जप्त नोटा या खऱ्या (ओरिजनल) चलनी नोटा असल्याचा अभिप्राय प्राप्त झाला आहे. पुढील तपास सुरु आहे.

तसेच पुणे येथे ८७ कोटी रुपयांच्या बनावट नोटा चलनात आणणाऱ्या टोळीविरुध्द विमानतळ पोलीस स्टेशन पुणे, येथे दिनांक ११/०६/२०२० रोजी गु.र.नं ४७४/२०२० भा.दं.वि. कलम ४८९ (अ)(ब)(क), ४२०, १२० (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच एका आरोपीला मा. न्यायालयाने जामीनावर मुक्त केले आहे. सदर प्रकरणी न्यायालयामध्ये दिनांक ७/०९/२०२० रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. तद्नंतर दिनांक २९/०९/२०२० रोजी पुरवणी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## पवनी (ता.रामटेक, जि.नागपूर) येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ मध्ये रूपांतरित करण्याबाबत

**(९) * २०५८६ ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पवनी (ता.रामटेक, जि.नागपूर) येथील श्रेणी-२ पशुवैद्यकीय दवाखाना हा मागील १५ वर्षापासून बंद असल्यामुळे पवनी व जवळच्या गावांमधील पशुपालकांना गुरांच्या उपचारासाठी देवलापार व हिवरा बाजार येथे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पशुवैद्यकीय दवाखान्याचे श्रेणी-१ मध्ये रुपांतर करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाला प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पवनी येथील पशुवैद्यकीय दवाखान्याचे श्रेणी-१ मध्ये रुपांतर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार :** (१) पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ पवनी येथील पशुधन पर्यवेक्षकाचे पद दिनांक १२.०७.२०११ पासून तर परिचराचे पद दिनांक १.०७.२०११ पासून रिक्त आहे. सदरची दोन्ही पदे रिक्त असल्यामुळे या दवाखान्याचे कामकाज नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यातील पशुधन पर्यवेक्षक यांचेकडे अतिरिक्त कार्यभार सोपवून चालविण्यात येत आहे. त्यामुळे तेथील पशुपालकांची गैरसोय होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे. सदरची रिक्त पदे तातडीने भरण्याच्या सूचना आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांना देण्यात आलेल्या आहेत.

(२) राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ पवनी या संस्थेचे रूपांतर श्रेणी-१ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यात करण्यासाठीचा प्रस्ताव क्षेत्रिय कार्यालयाकडून प्राप्त झालेला नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सूतगिरणी प्रकल्प आराखड्याची आर्थिक मर्यादा वाढविण्याबाबत

**(१०) * २२०८५ श्रीमती श्वेता महाले (चिखली)** : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहकारी सूतगिरणीचा प्रकल्प आराखडा ६१.५४ कोटी रुपयांचा असून जमिनीच्या व बांधकामाच्या तसेच यंत्राच्या वाढलेल्या किंमतीमुळे सहकारी सूत गिरणीचे काम तेवढ्या किंमतीत होत नसून सूतगिरणी प्रकल्प आराखडा ६१.५४ कोटी रुपयांवरुन ८०.९६ कोटीपर्यंत वाढविण्यासाठी सन २०१९ मध्ये मान्यता देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मान्यतेनुसार सदरहू सूतगिरणीचा प्रकल्प आराखडा वाढविणेबाबत अधिकारी पातळीवर दिरंगाई होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सहकारी साखर कारखान्यांसाठी बँक गॅरंटी, सॉफ्ट लोन इत्यादी सुविधा देत असताना सहकारी सूत गिरणीसाठी शासन दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर सहकारी सूतगिरणी यशस्वीपणे चालू राहण्यासाठी आणि सूतगिरणीचा प्रकल्प आराखड्याची मर्यादा ६१.५४ कोटी रुपयांवरून ८०.९६ कोटीपर्यंत वाढविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख** : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) या विभागाचे शासन निर्णय दिनांक २६.०३.१९८७ अन्वये सहकारी सूतगिरण्यांच्या पुनर्वसनासाठी थकीत वैधानिक देणी व इतर आर्थिक अडचणी सोडविण्यासाठी शासनाकडून कर्ज रुपाने अर्थसहाय्य करण्यात येत आहे.

राज्यातील चालू असलेल्या सहकारी सूतगिरण्यांना आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी दिनांक ०३.१२.२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील ५४ सहकारी सूतगिरण्यांना एकूण रुपये १०६.६५ कोटी इतके बिनव्याजी कर्ज उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

तसेच शासन निर्णय, दिनांक ११ जानेवारी, २०१७ अन्वये, सहकारी सूतगिरण्यांनी वित्तीय संस्थांकडून / रा. स. वि. म. कडून रुपये ३,०००/- प्रति चाती प्रमाणे ५ वर्षाच्या मुदतीसाठी कर्ज घेण्यास परवानगी देण्यात आली असून त्या कर्जावरील १२ % पर्यंतच्या व्याजाचा भरणा शासन करीत आहे.

(४) सहकारी सूतगिरण्यांचा प्रकल्प किंमत रुपये ६१.७४ कोटी वरुन रुपये ८०.९० कोटी करण्यासंदर्भात मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०२.०३.२०२० रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये मा.मुख्य सचिव यांनी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांचेकडून नुकतेच अभिप्राय प्राप्त झाले असून, त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पारोळा (जि.जळगांव) येथे तरुणीचे अपहरण करुन सामूहिक अत्याचार केल्याबाबत

**(११) * २३०७० डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारोळा (जि.जळगांव) येथील तीन नराधमांनी दिवाळी सणानिमित्त मामाकडे आलेल्या २० वर्षीय तरुणीचे अपहरण करुन तिच्यावर सामूहिक अत्याचार व शिवीगाळ करुन विष पाजल्याचे दिनांक ८ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तरुणीचा दिनांक १० नोव्हेंबर, २०२० रोजी उपचारादरम्यान मृत्यू झाला असून पारोळा पोलीस ठाण्यात महिला अत्याचारांसह अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी पोलीस चौकशीत असे आढळून आले की, आरोपीने त्याचे लग्न झालेले असताना सुध्दा फसवणूक करण्याच्या उद्देशाने पिडीतेचा विश्वास संपादित करुन तिला सोबत राहण्याचे खोटे आमिष दाखवून फक्त लैंगिक शोषण करण्याच्या उद्देशाने पिडीतेसोबत (मयत) लैंगिक संबंध प्रस्थापित करत लैंगिक अत्याचार केला, म्हणून आरोपीविरूध्द पारोळा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.२०६/२०२० गुन्हा दाखल करण्यात आला असून भा.दं.वि.सं. कलम ३०६, ३७६, ४२०, ५०४, ५०६ सह अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंध सुधारणा) अधिनियम, २०१५ चे कलम ३(२)(v)(va), ३(w)(I)(II) अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकरी मित्रांना थकित मानधन अदा करण्याबाबत

**(१२) * २१०९४ श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर)** : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी विषयक योजना शेतकऱ्यांपर्यत पोहोचविण्यासाठी कृषी अधिकारी व शेतकरी यांच्यामध्ये दुवा म्हणून काम करणाऱ्या तसेच कृषी सहायक यांच्यासोबत शेतकरी मित्र या पदावर काम करणाऱ्या व्यक्तींना एकूण १२ हजार रुपये वार्षिक मानधन देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शेतकरी मित्र यांना माहे जून, २०२० पासून मानधन मिळाले नसून रत्नागिरी जिल्हयात कार्यरत असलेल्या एकूण ४२३ शेतकरी मित्रांना मागील १५ महिन्यांचे मानधन मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शेतकरी मित्र यांना थकित मानधन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) रत्नागिरी जिल्ह्यात शेतकरी मित्रांची एकूण संख्या ७६८ आहे. त्यापैकी १९४ शेतकरी मित्रांची देयकाची रक्कम रु.१७.२७ लक्ष आहे.

(३) होय. कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर वित्त विभागाच्या दिनांक ०४.०५.२०२० च्या शासन निर्णयानुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. त्यास अनुसरुन निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईच्या डबेवाल्यांची झालेली फसवणूक

**(१३) * २१३९० श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या डबेवाल्यांना मोफत दुचाकी देण्यात येत असल्याचे सांगून डबेवाल्यांच्या नावे कर्ज घेऊन त्यांची फसवणूक केल्याप्रकरणी मुंबई डबेवाला असोसिएशनचे अध्यक्ष यांना घाटकोपर पोलिसांनी दिनांक ४ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५ मध्ये वेगवेगळ्या कागदपत्रांवर डबेवाल्यांची स्वाक्षरी घेऊन भैरवनाथ पतसंस्थेकडून डबेवाल्यांच्या नावे कर्जही घेतले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुषंगाने संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) मुंबई डबेवाला असोसिएशनचे अध्यक्ष सुभाष गंगाराम तळेकर यांना दिनांक ०५.०१.२०२१ रोजी घाटकोपर पोलीसांनी अटक केली आहे.
(२) होय.
(३) व (४) सुभाष तळेकर व इतर यांनी मुंबई जेवण डबे वाहतूक मंडळाचे तत्कालीन पदाधिकारी असताना त्यांच्यावर असलेल्या विश्वासाचा गैरफायदा घेऊन मंडळाचे सदस्यांना मोफत टीव्हीएस मोपेड मिळवून देणार असा बहाणा करुन सदस्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन एकूण ६० सदस्यांचे वाहन कर्ज भैरवनाथ पतसंस्था, वाशी, नवी मुंबई यांचेककडून मंजूर करुन घेतले. त्यानंतर साई एंटरप्रायजेसचे राकेश प्रसादे व टिव्हस्टा टुव्हिलर चे भावेश दोशी यांचेशी संगनमत करुन कर्जाची रक्कम त्यांनी पतसंस्थेकडून वर्ग करुन घेतली. तसेच एकूण ६० सदस्यांपैकी ३८ सदस्यांना पुरेशी कागदपत्रे नसलेल्या टीव्हीएस मोपेड दिल्या. त्या कागदपत्रे नसल्याने ते चालवू शकत नाहीत. अशा प्रकारे त्यांचे नुकसान केले. तसेच २२ सदस्यांच्या नावे मंजूर कर्जाची रक्कम रुपये ६,८७,५००/- घेऊन त्यांना टीव्हीएस मोपेड न देता त्यांची फसवणूक केली म्हणून नमूद गुन्ह्यातील ५ पैकी ४ आरोपींना अटक करण्यात आली असून ३ आरोपी हे न्यायालयीन कोठडीत आहेत. नमूद गुन्हयातील १ आरोपीचा शोध चालू आहे. गुन्हा अद्याप तपासाधीन असून पोलीस पुढील तपास करीत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील दुध उत्पादक शेतकऱ्यांचे कोरोना टाळेबंदी कालावधीमध्ये झालेले नुकसान

**(१४) * २०५९९ श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे ४८ लाख दुध उत्पादक असून कोरोनाची टाळेबंदी जाहिर होण्यापूर्वी दूधाचा दर प्रतिलिटर रुपये ३२ ते ३५ रुपये असताना टाळेबंदीमुळे दुध विक्री, दुध वितरणाच्या सर्व व्यवस्था व उद्योगधंदे बंद झाल्याने दुधाचा प्रतिलिटर दर १७ रुपयांनी कमी झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे दुध उत्पादकांना सुमारे ७१४० कोटी रुपये मिळणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात एकूण ३०३४ कोटी रुपये मिळाल्यामुळे दुध उत्पादकांचे मागील पाच महिन्यांत सुमारे ४१०६ कोटी रुपयांचे नुकसान झाले असल्याचे दिनांक १९ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील दुध संघांनी आर्थिक हित साधल्यामुळे दुध उत्पादक शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील दुध उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार** : (१) कोरोना टाळेबंदी होण्यापूर्वी सहकारी व खाजगी क्षेत्रातील प्रकल्पाकडुन दुधासाठी प्र.लि. रु. २८/- ते रु. ३०/- इतका दर दिला जात होता. तथापि, टाळेबंदीच्या कालावधीमध्ये सहकारी संघाकडून दुधासाठी प्र.लि. रु.२५/- या दराने व खाजगी दुग्ध प्रकल्पांकडून दुधासाठी प्र.लि. रु.२२/- ते रु.२५/- या दराने दुध खरेदी दर दुध उत्पादकांना देण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) राज्यातील लॉकडाऊन परिस्थितीत शासनाने दिनांक ३.४.२०२० व दिनांक २७.४.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील अतिरिक्त दुधापैकी प्रतिदिन १० लक्ष लिटर दुध स्विकृत करुन सदर दुधाचे दुध भुकटीत रुपांतरण

केले आहे. सदर योजना ६ महिन्याकरीता राबविण्यात आली असून या योजनेअंतर्गत दुध उत्पादक शेतकऱ्यांना रु. २५/- प्रतिलिटर असा दर देण्यात आला आहे. या योजनेवर शासनाने एकूण रु. २८७ कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे.

या योजनेमुळे राज्यातील लॉकडाऊन परिस्थितीत दुध खरेदीचे दर स्थिर राहुन दुध उत्पादक शेतकऱ्यांना वाजवी भाव देण्याचा शासनाने पुर्ण प्रयत्न केला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे तिसगांव (जि.औरंगाबाद) येथील खदानधारकांनी गौण खनिजांचे अवैध उत्खनन केल्याबाबत

**(१५) * २४०४२ श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे तिसगांव (जि.औरंगाबाद) येथील १३ खदानधारकांनी चार वर्षापूर्वी सुमारे २२२ कोटीं ६७ लाख रक्कमेच्या खनिजांचे अवैध उत्खनन केले असल्याचे भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयाच्या लेखापरिक्षणात आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सुनावणी घेऊन एकुण ११ कोटी रुपयांचा दंड तहसीलदार यांनी निश्चित केला असताना अद्यापही दंड वसूल करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधित दोषींविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) व (२) सन २०१६ मध्ये मौजे तिसगांव ता.जि.औरंगाबाद येथील १३ खदानधारकांनी १०,१०,९७५ ब्रास गौण खनिजांचे उत्खनन केले असल्याचे उपसंचालक भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय,

औरंगाबाद यांच्या पथकाने केलेल्या मोजणीमध्ये आढळून आले. त्याअनुषंगाने सदर १३ खदानधारकांना तत्कालीन तहसिलदार औरंगाबाद यांनी नोटीसा दिल्या.

तद्नंतर अपर तहसिलदार, औरंगाबाद यांनी सुनावणी घेवून सदर खदानधारकाकडून वेळोवेळी देण्यात आलेले परवानगी आदेश व स्वामित्वधनाचा भरणा यांचा ताळमेळ घेवून १३ खदानधारकाकडून रुपये ४५,१४,०२,२००/- एवढी फरकाची रकमा भरणा करण्याचे आदेश पारीत केले आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खेड (जि.पुणे) तालुक्यामध्ये मुरूमाचे बेकायदेशीररित्या उत्खनन होत असल्याबाबत

**(१६) * २११८९ श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर)** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील भीमा, इंद्रायणी नदीतील वाळूचा उपसा व शिंदेवही, वराळे, शेलू, खालुम्ब्रे, सावरा, बोरदरा या गावांमध्ये मुरूमाचे बेकायदेशीररित्या उत्खनन केल्यामुळे शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसूलाचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चाकण औद्योगिक वसाहतीच्या विकासाकरिता शिंदेवही, वराळे, शेलू, खालुम्ब्रे, सावरा, बोरदरा या गावांमधुन कोट्यवधी रुपयांच्या मुरुमाचे बेकायदेशीररित्या उत्खनन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार खेड तालुक्यातील उक्त गावांमध्ये मुरुमाचे बेकायदेशीररित्या उत्खनन करणाऱ्या संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात** : (१), (२), (३) व (४) गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करण्याकरिता तहसिल स्तरावर भरारी पथकाची स्थापना करण्यात आली आहे. खेड तालुक्यात माहे एप्रिल, २०२० ते जानेवारी, २०२१ या

कालावधीत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ११ प्रकरणात रुपये ३०,४१,०९५/- एवढी दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. तसेच एका प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यशस्वीनी महिला ब्रिगेडच्या अध्यक्षा रेखा जरे यांच्या हत्येबाबत

**(१७) * २२५७६ श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यशस्वीनी महिला ब्रिगेडच्या अध्यक्षा रेखा जरे यांच्या हत्याकांडातील मुख्य सुत्रधार पत्रकार बाळ जगन्नाथ बोठे यांना पोलिसांनी अटक केली आहे काय,

(२) सदरहू आरोपीला अद्याप अटक केली नसल्यास तपासाची सद्यःस्थिती काय आहे,

(३) तसेच, याप्रकरणी यशस्वीनी महिला ब्रिगेडच्या अध्यक्षा रेखा जरे यांच्या मुलाने श्री.बोठे यांच्यापासून जरे कुटुंबियांच्या जीवाला धोका असल्याने पोलीस संरक्षण मिळावे अशी मागणी दिनांक ७ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास जिल्हा पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) व (२) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, सुपा येथे दिनांक ०१/१२/२०२० रोजी गु.र.नं.४७८/२०२० भा.दं.वि.कलम ३०२, १२० (ब), ३४ प्रमाणे एकूण ६ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच आरोपी बाळ ऊर्फ बाळासाहेब बोठे हा मिळून न आल्याने त्याच्या शोधार्थ तीन पोलीस पथके तयार करण्यात आली आहेत. तसेच मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पारनेर न्यायालयाकडून सदर आरोपीचे

अटकेकरीता सी. आर. पी. सी. ७३ अन्वये स्टँण्डीग वॉरंट काढण्यात आले आहे. सदर वॉरंट बजावणीकामी संपुर्ण राज्यात, महाराष्ट्रातील सर्व घटक प्रमुखांना तसेच महाराष्ट्राबाहेर सर्व घटक प्रमुखांना बजावणीकामी पाठविण्यात आलेले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) यशस्वीनी महिला ब्रिगेडच्या अध्यक्षा मयत रेखा जरे यांच्या कुटुंबीयांना नि:शुल्क तत्वावर ०२ सशस्त्र पोलीस अंगरक्षक पुरविण्यात आले आहेत.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## मुंब्रा (जि.ठाणे) खाडी परिसरात बेकायदेशीररित्या होत असलेला वाळू उपसा

**(१८) * २४३९३ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंब्रा (जि.ठाणे) खाडी परिसरात मा.न्यायालयाच्या बंदीचे आदेश असतानाही रेती माफियांकडून बेकायदेशीररित्या वाळू उपसा होत असल्यामुळे तेथील कांदळवनेही नष्ट होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंब्रा-दिवा खाडीतील रेती माफियांच्या मनमानीला आळा घालण्यासाठी शासनाने कारवाई करून दोन कोटीच्या ८ बार्ज व ६४ लाखांचे आठ सक्शन पंप जेसीबीद्वारे तोडले असून या खाडीच्या किनारी रेती साठवण्याचे १५ कुंडही तोडलेले असतानाही राजरोसपणे दररोज ६० ते ७० ब्रास वाळू उपसा होत असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सतत वाळू उपसा केल्यामुळे जलद रेल्वे मार्गावरील रेल्वे पुलाजवळ खाडी पात्राची रुंदी मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने अतिवृष्टीमुळे या खाडीचे पाणी रेल्वे रुळांवर जात असून पात्र खोल झाल्यामुळे खाडीतील दोन्ही

जुन्या पुलांना धोका निर्माण होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंब्रा खाडीत सक्शन पंपाद्वारे अवैधरित्या सुरू असलेल्या बेसुमार वाळू उपसा करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात** : (१) सदर ठिकाणी बेकायदेशीर वाळू उपसा होत आहे हे खरे आहे व कांदळवने नष्ट करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आली नाही.
(२) दिनांक ११/२/२०२१ रोजी ठाणे जिल्हयातील मुंब्रा-दिवा खाडी परिसरात अनधिकृत वाळू उपसा करण्यासाठी वापरात असलेले एकूण रुपये १.८५ कोटी इतक्या रक्कमेचे ८ बार्ज व ५ सक्शनपंप पकडण्यात येऊन नष्ट करण्यात आले आहे. सदर ठिकाणी दररोज ६० ते ७० ब्रास वाळू उपसा होत असल्याची बाब खरी नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) ठाणे जिल्हयातील मुंब्रा खाडी परिसरात अनधिकृत वाळू उपसा रोखणेकामी जिल्हास्तरावर/ उपविभागीय स्तरावर तसेच तालुकास्तरावर नियुक्त करण्यात आलेल्या दक्षता पथकांमार्फत वेळोवेळी कडक मोहिम राबविण्यात येते. त्यानुसार मुंब्रा खाडी परिसरात माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये २ बार्ज व २ सक्शनपंप असा एकूण रु.३२ लाखांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला आहे व ६ व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच दिनांक ११/२/२०२१ रोजी अनधिकृत वाळू उपसा करण्यासाठी वापरात असलेले एकूण रुपये १.८५ कोटी इतक्या रक्कमेचे ८ बार्ज व ५ सक्शनपंप पकडण्यात येऊन नष्ट करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे राहू (ता.दौंड, जि.पुणे) येथील भूधारकाकडून अनर्जित उत्पन्नाची वसूली करण्याबाबत

**(१९) * २३७५२ श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे राहू (ता.दौंड, जि.पुणे) येथील गट क्रमांक २२०/२ मधील ४.८० हेक्टर (४८,००० चौ.मी.) जमीन अकृषक प्रयोजनार्थ विक्री करण्याची परवानगी देवून संबंधितांकडून सुमारे २७ लाख ४३ हजार रूपये अनर्जित उत्पन्नापोटी वसूल केल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी माहे एप्रिल, २००८ च्या शासन निर्णयानुसार जमिनीचे बाजारमूल्य अंदाजे १ कोटी ३८ लाख रूपये इतके निर्धारित करून भूधारकाकडून १ कोटी ३ लाख रूपये अनर्जित उत्पन्नापोटी वसूल करणे आवश्यक होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जमिनीचे बाजरमूल्य जाणीवपूर्वक कमी दर्शवून ७६ लाख ३ हजार रूपयांचे अनर्जित उत्पन्न कमी आकारण्यात आल्यामुळे शासनाच्या महसूलाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधित भूधारकाकडून उर्वरित अनर्जित उत्पन्नाची वसुली करणेबाबत तसेच या प्रकरणी न्यूनतम अनर्जित उत्पन्नाची वसूली करणारे संबंधित अधिकारी, कर्मचारी यांची चौकशी करून त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, या कारवाईचा तपशील काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) महालेखापाल, नागपूर यांच्या तपासणीमध्ये निदर्शनास आलेल्या वस्तुस्थितीनुसार मौजे राहू, ता.दौंड येथील गट नं.२२०/२ क्षेत्र ४.८० हे. आर या जमिनीस अकृषीक प्रयोजनार्थ मूल्यांकित केलेली अनर्जित उत्पन्नाची उर्वरित रुपये ५२,३६,६५०/- इतकी रक्कम वसूल करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, पुणे यांचे स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केळी पिकाला फळपिकाचा दर्जा देण्याबाबत

**(२०) * २४५६९ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केळी पिकाला फळ पिकाचा दर्जा मिळण्याबाबतची लेखी निवेदने केळी उत्पादक शेतकरी, केळी उत्पादक संघटना व लोकप्रतिनिधी यांनी मागील अनेक वर्षापासुन शासनाकडे दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, धुळे व जळगाव जिल्हयात केळीचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत असून केळीला फळ पिकाचा दर्जा देण्यात यावा अशी मागणी स्थानिक शेतकऱ्यांनी माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जळगाव जिल्हयात ४७ हजार हेक्टर जमिनीवर केळी लागवड केली जात असून सदर केळीच्या व्यवसायात ६ हजार कोटी रुपयांची वार्षिक उलाढाल होत असताना तसेच जगाच्या बाजारपेठेत गुणात्मक दर्जा प्राप्त असलेल्या जळगाव जिल्हयातील उत्पादित केळीला केंद्राने अजुनही फळाचा दर्जा दिलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केळीचा बहुवार्षिक पिकात समावेश असल्याने फळाचा दर्जा मिळण्यासाठी कायद्यात सुधारणा करण्याची आवश्यकता असून त्यानुसार कायद्यात सुधारणा करण्याबाबतची शिफारस राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) केंद्र शासनाकडून केळीला फळाचा दर्जा देण्याबाबत कोणतेही आदेश नाहीत. तथापि, केळी पिकाचा फळपिकामध्ये समावेश गृहीत धरुन केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांमधून अर्थसहाय्य दिले जाते.

(४) धुळे व जळगांव जिल्हयातील केळी उत्पादक शेतकऱ्यांना केळी पिकाचा दर्जा देण्याबाबत केलेल्या विनंतीनुसार केंद्र शासनास कृषी आयुक्त कार्यालयाकडून दिनांक २६.०२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर व उस्मानाबाद जिल्हयातील शेतकऱ्यांना ठिबक सिंचन योजनेचे अनुदान मिळण्याबाबत

**(२१) * २४५२७ श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य व केंद्र शासनाने सन २०१९-२० मध्ये अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी ७५ ते ८० टक्के अनुदानांची ठिबक सिंचन योजना सुरु केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उस्मानाबाद व सोलापूर या जिल्हयांना ठिंबक सिंचनाचे अनुदान मिळाले नसल्यामुळे सुमारे ५००० शेतकरी अनुदानाच्या प्रतिक्षेत असून याकरिता एकूण ५ कोटी रुपयांची मागणी करण्यात आली असता अद्यापही निधी न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक संकटांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सोलापूर जिल्हयातील अल्पभूधारक शेतकऱ्यांनी व्याजाने कर्ज व बँकेकडून शेतकरी कर्ज घेवुन ठिबक संच बसविलेले असून ३६६ शेतकऱ्यांनी अनुदानाचा प्रस्ताव कृषी विभागाकडे दिलेले असताना शासनाकडून अद्यापपर्यंत अनुदान मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सोलापूर व उस्मानाबाद जिल्हयांतील ठिबक सिंचन योजनेतील लाभार्थ्यांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेमधून, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत अल्प व अत्यल्प भू-धारक शेतकऱ्यांना देय ५५% अनुदानास २५% पुरक अनुदान देऊन ८०% अनुदान व इतर शेतकऱ्यांना (५ हेक्टरच्या मर्यादेत) ४५% अनुदानास ३०% पुरक अनुदान देवुन ७५% अनुदान देण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला आहे.

(२), (३) व (४) नाही, पूर्वसंमती प्राप्त सूक्ष्म सिंचन संचाची उभारणी करुन अनुदानासाठी प्रस्ताव सादर केलेल्या उस्मानाबाद जिल्ह्यातील ९०८१ अर्जदारांपैकी ८१७५ अर्जदारांच्या बँक खात्यावर रु.१३.४० कोटी व सोलापूर जिल्ह्यातील १२९४८ अर्जदारांपैकी १११९८ अर्जदारांच्या बँक खात्यावर रु.२५.१६ कोटी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत देय अनुदानाची रक्कम जमा करण्यात आली आहे. उर्वरित अर्जदारांना अनुदानाची रक्कम वाटप करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

कोविड-१९ या संसर्गजन्य रोगामुळे उद्भवलेल्या आर्थिक परिस्थितीमुळे सन २०१९-२० या वर्षात पुरक अनुदानासाठी निधी उपलब्ध होऊ शकला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना पुरक अनुदानाची रक्कम देता आली नाही. पुरक अनुदानासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ग्रामीण भागात मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प राबविण्याबाबत

**(२२) * २१८२२ श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.चंद्रकांत जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतमालाला चांगला दर मिळण्यासाठी ग्रामीण भागात गोदामे व शीतगृहे उभारणे, अन्न प्रकिया उद्योग उभारण्यासाठी मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प राबविण्याचा निर्णय शासनाने माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पाचे स्वरुप काय आहे तसेच, यासाठी किती निधीची आवश्यकता आहे, प्रत्यक्षात निधी किती व केव्हा उपलब्ध करून देण्यात आला आहे,

(३) असल्यास, प्रकल्पाची अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे काय, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे व यासाठी किती निधी माहे जानेवारी, २०२१ पर्यंत खर्च करण्यात आला आहे,
(४) सदरहू योजनेची अंमलबजावणी अद्याप सुरु करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय. मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.
(२) या प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांना उत्पादक कंपन्या/ गटांमार्फत संघटीत करुन गट शेतीवर भर देणे व त्या माध्यमातून शेतमालाचे संकलन करुन शेतकऱ्यांना थेट प्रक्रियादार/निर्यातदारांशी जोडून त्यांचा बाजार संपर्क वाढविणे तसेच, राज्यातील सर्व प्रमुख पिकांसाठी स्पर्धात्मक व सर्वसमावेशक मूल्य साखळ्या विकसित करण्यात येणार आहेत. या प्रकल्पासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने एकूण सुमारे २१०० कोटी (US$ ३०० दशलक्ष) गुंतवणूक केली जाणार आहे. प्रकल्प कार्यान्वित करण्याकरिता सन २०१९-२० मध्ये रक्कम रु.४.६० कोटी खर्च करण्यात आलेली आहे. सन २०२०-२१ करिता अर्थसंकल्पीय तरतूद रक्कम रु.७०.०० कोटी असून सुधारित अर्थसंकल्पीय तरतूद रक्कम रु.२२.९७ कोटी प्रस्तावित करण्यात आली आहे. सन २०२०-२१ करिता प्रकल्पाकरिता रु.१०.६६ कोटी उपलब्ध करुन दिलेले आहेत.
(३) मा.मुख्यमंत्री महोदयांचे हस्ते प्रकल्पाचे उदघाटनाचा कार्यक्रम दिनांक १०/०९/२०२० रोजी संपन्न झाला. त्याच वेळी प्रकल्पात सहभागी होवू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांच्या संस्था व खरेदीदारांचे ऑनलाईन अर्ज मागविण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार ११५९४ संस्थानी नोंदणी केली. ५७६४ संस्थाचे अर्ज प्राप्त झाले आहेत. तसेच राज्यात २९ पथदर्शी उप प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सन २०२०-२१ या अर्थसंकल्पीय वर्षामध्ये प्रकल्पाकरिता उपलब्ध करुन दिलेल्या निधीपैकी रु.६.०५ कोटी खर्च झालेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुल (जि.चंद्रपूर) येथे शासकीय कृषी महाविद्यालयाच्या इमारत बांधकामासाठी व वेतनासाठी अनुदान मिळण्याबाबत

**(२३) * २१२०२ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील व लगतच्या दुरस्थ ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सुविधेसाठी व त्यांच्या कृषी शिक्षणासाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत मुल (जि.चंद्रपूर) येथे शासकीय नवीन घटक कृषी महाविद्यालय स्थापन करण्यास शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग क्र. पंदेवि १३१८/प्र.क्र. १०७/७ ऐ, दिनांक २८.२.२०१९ अन्वये शासनाने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शासकीय कृषी महाविद्यालयाच्या नवीन इमारत बांधकामाचा रू.१३३.३५ कोटीचा सुधारित आराखडा विद्यापीठाद्वारे कृषी परिषद, पुणे यांचेमार्फत शासनाच्या बांधकाम प्रस्ताव उच्चस्तर समिती, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे अंतिम मंजुरीसाठी सादर करण्यात आलेला असतानाही सदर महाविद्यालयाच्या इमारत बांधकामासाठी शासनाकडून अद्याप निधीची तरतूद करण्यात आलेली नसल्यामुळे इमारत व प्रयोगशाळा बांधकामास प्रारंभ करता आला नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मुल (जि. चंद्रपूर) येथील शासकीय कृषी महाविद्यालयाच्या इमारत बांधकामासाठी व वेतनासाठी आवश्यक अनुदान त्वरीत उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री व कृषी मंत्री यांना दिनांक २८ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने सदरहू शासकीय कृषी महाविद्यालयाच्या इमारत बांधकामासाठी व वेतनासाठी आवश्यक अनुदान मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) मौजे मुल-मरोडा, जि. चंद्रपुर येथील कृषी महाविद्यालयाचे बांधकामासाठी रु.१३३.३५ कोटी रकमेच्या अंदाजपत्रकांना मान्यता देण्याकरीता प्रस्ताव सचिव समितीच्या दिनांक २८.१.२०२० रोजीच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला होता, त्यावर समितीमार्फत महाराष्ट्रातील सर्व कृषी महाविद्यालयांच्या कार्यरततेचा आढावा घेऊन अभिप्राय सादर करणेबाबत मा.सचिव (कृषी) यांना सुचित केले होते. त्यानुसार विभागाच्या दिनांक २७.०२.२०२० चे पत्र व दिनांक ६.११.२०२० तसेच दिनांक ९.२.२०२१ चे स्मरणपत्रान्वये, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचेकडुन अहवाल मागविण्यात आला आहे.

चालु आर्थिक वर्षामध्ये कृषी महाविद्यालय मुल जि. चंद्रपूर करीता ३१-सहायक अनुदान (वेतनेतर) करीता रु.५०.०० लाख, व ३५-भांडवली मत्तेच्या निर्मितीकरीता अनुदान करीता रु.८५.०० लाख व ३६- सहायक अनुदान (वेतन) करीता रुपये १००.०० लाख अनुदान अर्थसंकल्पीत करण्यात आलेले आहे. त्यापैकी ३६- सहायक अनुदान (वेतन) याकरीता ८० टक्केच्या मर्यादेत अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.

तसेच वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक अर्थसं-२०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३, दिनांक ४ मे, २०२० अन्वये, कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत उपाययोजना आखण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र.१३ नुसार, "सर्व विभागांनी पुढील आदेशापर्यंत कोणतेही बांधकाम हाती घेऊ नये. त्यामुळे चालु वर्षामध्ये कोणत्याही नवीन बांधकामांना या विभागाकडुन मान्यता देण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्हयातील रेती घाटांवर अवैधरित्या वाळू उपसा होत असल्याबाबत

**(२४) * २०८७१ श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव)** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील रेती माफीया व खनिकर्म विभागाच्या अधिकाऱ्यांनी संगनमत करुन रेती घाटांवरील रेतीचा अवैधरित्या उपसा केल्यामुळे शासनाच्या सुमारे २५ कोटी महसूलाचे नुकसान झाले असल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयात रेती घाटांचे लिलाव होत नसल्यामुळे अवैध रेती उपसा मोठ्या प्रमाणात होत असून खनिकर्म विभागाच्या दुर्लक्षामुळे रेती घाट लिलावास दिरंगाई होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने अवैधरित्या रेती उपसा करणाऱ्या संबंधितांसह व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात** : (१) हे खरे नाही.

(२) व (३) गोंदिया जिल्हयात १४ रेतीघाटांना पर्यावरण मान्यता प्राप्त झाली आहे. सदर १४ रेतीघाटांपैकी ०४ रेतीघाट शासनाच्या गृहनिर्माण योजनांसाठी राखीव ठेवले आहे. उर्वरीत रेतीघाटांची लिलावाची प्रक्रिया सुरु आहे.

गोंदिया जिल्हयात माहे एप्रिल २०२० ते डिसेंबर २०२० या कालावधीत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या २७३ प्रकरणात दंडात्मक कारवाई करुन रुपये १,८५,३६,५००/- एवढी वसुली करण्यात आली आहे. तसेच २५ प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मच्छीमारांना डिझेल कोटा पूर्वीप्रमाणे उपलब्ध करुन डिझेल परतावा थकबाकीची रक्कम अदा करण्याबाबत

**(२५) * २०५२६ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर, उपनगर आणि पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्हयांतील मच्छीमारांना डिझेल परताव्याची सुमारे २३० कोटी रुपयांची असलेली थकबाकी देण्यास दिरंगाई केली जात असताना, मासेमारी करण्यासाठी १५ दिवसांसाठी देण्यात येणारा सुमारे चार हजार लिटर्स डिझेल कोटा निम्म्याने कमी करुन १७५० लिटर्स देण्याचे आदेश मत्स्य व्यवसाय आयुक्तांनी निगर्मित केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकणातील सात जिल्हयांतील १६० मच्छीमार संस्थांच्या ९६४६ मासेमारी करणाऱ्या यांत्रिक नौकांना १५ दिवसांसाठी १,७५० लिटर्स डीझेल देण्याचे आदेश मत्स्यव्यवसाय, आयुक्त यांनी काढले असल्यामुळे खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्या यांत्रिक नौकेसाठी मच्छीमारांना देण्यात येणारा डिझेल कोटा अपुरा पडत असल्यामुळे त्यांना बाहेरुन जादा दराने डिझेल खरेदी करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मच्छीमारांना डिझेल परताव्याची सुमारे २३० कोटी असलेली थकबाकी देण्यास दिरंगाई होण्याची तसेच प्रत्येक मच्छीमारांना मासेमारी करण्यासाठी देण्यात येणारा डिझेल कोटा निम्म्याने देण्याबाबतची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, मच्छीमारांना मासेमारी करण्यासाठी देण्यात येणारा डिझेल कोटा पूर्वीप्रमाणे देण्याबाबत तसेच डिझेल परताव्याची थकबाकी विनाविलंब अदा करण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) दिनांक ०१ जानेवारी २०२१ ते ३१ मार्च २०२१ या तीन महिन्याच्या कालावधी करीता ३०% डिझेल कोटा मंजूर करण्याकरीता आवश्यक माहिती प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई कार्यालयामार्फत अप्राप्त असल्यामुळे दिनांक ०१/०१/२०२१ रोजीच्या डिझेल कोटा समितीच्या बैठकीमध्ये मासेमारी नौकांना तीन महिन्याकरीता ३०% डिझेल कोटा मंजूर करणे माहिती अभावी शक्य झाले नाही. उक्त माहिती अप्राप्त असतानासुध्दा मच्छीमारांची गैरसोय होऊ नये तसेच त्यांचे नुकसान होऊ नये या करीता दिनांक ०१ जानेवारी २०२१ ते १५ जानेवारी २०२१ (१५ दिवसांसाठी) ५ टक्के डिझेल कोटा मंजूर करण्यात आलेला होता. तद्नंतर प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई कार्यालयामार्फत दिनांक ११/०१/२०२१ रोजी माहिती प्राप्त झाल्यावर दिनांक १३/०१/२०२१ रोजी डिझेल कोटा समितीची बैठक आयोजित करुन पात्र मच्छीमार नौकांना दिनांक १६/०१/२०२१ ते ३१/०३/२०२१ या कालावधी करीता २५% डिझेल कोटा मंजूर करण्यात आलेला आहे.

(३) प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई कार्यालयाकडून महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ च्या तरतूदीचे उल्लंघन केलेल्या नौकांचे दाखल प्रतिवेदने, परवाने निलंबित अथवा रद्द याबाबतची माहिती अप्राप्त असल्यामुळे मच्छीमारांची गैरसोय होऊ नये या करीता दिनांक ०१ जानेवारी २०२१ ते १५ जानेवारी २०२१ (१५ दिवसांसाठी) ५ टक्के डिझेल कोटा मंजूर करण्यांत आलेला आहे. डिझेल कोटा १५ दिवसांकरीता मंजुर करण्याबाबतचा निर्णय हा तात्पुरत्या स्वरूपात डिझेल कोटा समितीने घेतला होता. परंतु

तद्नंतर माहिती प्राप्त झाल्यानंतर पात्र नौकांना निकषानुसार उर्वरीत कालावधीसाठी डिझेल कोटा मंजुर करण्यात आलेला आहे.

(४) सन २०२०-२१ या वर्षाकरीता पात्र यांत्रिक नौकांसाठी १००% डिझेल कोटा मंजुर करण्यात आलेला आहे.

तसेच सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात डिझेल परताव्यासाठी अर्थसंकल्पित असलेला संपूर्ण निधी (रु. ६०.०० कोटी) वितरीत केला असून उर्वरीत थकीत रक्कम प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील मध्यवर्ती कारागृहांमध्ये क्षमतेहून अधिक कैदी असल्याबाबत

**(२६) * २२२३८ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई, येरवडा, ठाणे, औरंगाबाद, नागपूर, अमरावती, नाशिकरोड, कोल्हापूर आणि तळोजा या नऊ मध्यवर्ती कारागृहांची अधिकृत क्षमता २४ हजार ३२ इतकी असताना सध्या या कारागृहांमध्ये ३२ हजार २९३ म्हणजेच १३४ टक्के कैदी ठेवण्यात आले असल्याने कारागृहांच्या व्यवस्थापनाची समस्या निर्माण झाली असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिला कैद्यांचे प्रमाणही क्षमतेहून अधिक असल्याचे कारागृह विभागाकडून मिळालेल्या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील कारागृहांतील क्षमतेनुसार कैद्यांचे नियोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) दिनांक ३१.०१.२०२१ अखेर राज्यातील एकूण ६० कारागृहांतील अधिकृत बंदीक्षमता २४,०३२ इतकी असून, कारागृहांतील प्रत्यक्ष बंदीसंख्या ३२,९९७ इतकी आहे. म्हणजे अधिकृत बंदीक्षमतेशी एकूण प्रमाण १३७ टक्के आहे.

तथापि, राज्यातील मुंबई, येरवडा, ठाणे, औरंगाबाद, नागपूर, अमरावती, नाशिकरोड, कोल्हापूर आणि तळोजा या नऊ मध्यवर्ती कारागृहांतील अधिकृत बंदीक्षमता १४,४९१ इतकी आहे व दिनांक ३१.०१.२०२१ अखेर सदर ९ मध्यवर्ती कारागृहांमध्ये २३,८५८ बंदी असून, सदर बंदीसंख्या एकूण बंदीक्षमतेच्या १६५ टक्के आहे.

(२) होय, हे खरे आहे.

राज्यातील सर्व कारागृहांतील अधिकृत महिला बंदीक्षमता १२७५ इतकी असून, दिनांक ३१ जानेवारी, २०२१ अखेर राज्यात एकूण १४२१ महिला बंदी बंदिस्त आहेत.

(३) कारागृहातील बंद्यांची गर्दी कमी करण्याच्या उद्देशाने, त्यांचे नियोजन करण्यासाठी मुंबई, गोंदिया, अहमदनगर (नारायणडोह), पालघर व हिंगोली येथे नवीन कारागृहाचे बांधकाम तसेच येरवडा, पुणे आणि ठाणे या कारागृहांतील उपलब्ध जागेवर दुसरे कारागृह बांधण्याचे प्रस्तावित आहे. तसेच, जिल्हा व खुल्या कारागृहांमध्ये अतिरिक्त तसेच नवीन बॅरेक्स बांधणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई येथील डी.सी.डिझाइन्स प्रा.लि. कंपनीने कोट्यवधी रुपयांचा केलेला गैरव्यवहार

**(२७) * २०८९६ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील डी.सी.डिझाइन्स प्रा.लि.चे श्री.दिलीप छाब्रिया यांनी एकाच चेसिस आणि इंजिन नंबरची वेगवेगळया राज्यात अनेकदा नोंदणी करुन स्वतःच

तयार केलेल्या कारसाठी कर्ज घेऊन स्वत: खरेदी केल्या असून एका वाहनांवर अनेकदा कर्ज काढून हजारो कोटी रुपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, चौकशीनुसार या गैरव्यवहारातील संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) होय.

(२) व (३) श्री. दिलीप छाब्रिया व इतर यांच्याविरुध्द फिर्यादी श्री.इंदरमल रमाणी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ८७५/२०२० अन्वये गुन्हा नोंद करुन, गुन्हे शाखा येथे गु.प्र.शा. गु.र.क्र. १७३/२०२० अन्वये गुन्ह्याची पुनर्नोंदणी करण्यात आली आहे. सदर गुन्हयात ३ आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लोहा (जि.नांदेड) येथे आय.पी.एल. कंपनीच्या बनावट पोटॅश रासायनिक खतांच्या बॅगा विक्री केल्याबाबत

**(२८) * २३४०८ डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहा (जि.नांदेड) तालुक्यातील लोहा-पालम या रस्त्यावर एम.एच-२२ ए.एन.२२०७ या गाडी क्रमांकाच्या टेम्पोमधुन आय.पी.एल.कंपनीच्या बनावट पोटॅश खतांच्या बॅगा घेऊन जात असतांना पोलिसांनी त्या जप्त करुन सात व्यक्तींविरुध्द विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला असल्याचे दिनांक २६ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोहा पंचायत समितीचे कृषी अधिकारी यांनी खताचा नमुना तपासणीसाठी औरंगाबाद खत निरीक्षण प्रयोगशाळेत पाठवुन अहवाल मागितला असता त्या खतांमध्ये ०% पोटॅश नसल्याचे स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित फर्टिलायझरचे मालक व दोंषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) लोहा (जि. नांदेड) येथे लोहा पालम रस्त्यावर एम.एच २२ ए एन २२०७ या वाहन मालकाच्या टेम्पोमधून आय.पी.एल. कंपनीच्या बनावट पोटॅश खताच्या बॅगा घेऊन जात असताना पोलिसांनी जप्त करुन सात जणांविरुध्द विविध कलमान्वये पोलीस ठाणे, लोहा जि. नांदेड येथे FIR No ०२४७/२०२० दिनांक २७/११/२०२० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी चौकशी करुन मे. श्री. सावनली कृषी एजन्सी, नवीन मोंढा नांदेड व मे. तनिष्का ॲग्रोटेक, नवीन मोंढा नांदेड, ता. नांदेड, जि. नांदेड या निविष्ठा केंद्रांचे खत विक्री परवाने दिनांक १३/०१/२०२१ पासून निलंबित करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे सुसगाव (ता.मुळशी, जि.पुणे) येथील जमिनीच्या विकासाकरिता मुद्रांक शुल्क कमी आकारल्याबाबत

**(२९) * २३६०७ ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सुसगाव (ता.मुळशी, जि.पुणे) येथील सर्व्हे क्रमांक २१अे, हिस्सा क्रमांक २ मधील १.१२ हेक्टर (११,२०० चौ.मी.) जमिनीच्या विकासाकरिता भूधारक व विकासक यांच्यात झालेल्या विकास करारामध्ये एकूण ४६ लाख १४ हजार रूपयांचे मुद्रांक शुल्क आकारल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी दस्तऐवजाच्या खंड २ नुसार ४७ हजार चौ.फूट बांधकाम केलेले क्षेत्र भूधारकाचा हिस्सा म्हणून देण्याचे मान्य करण्यात आले

असून एकूण २५ कोटी रूपयांची सुरक्षा ठेव ही भुधारकास परत देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने उक्त प्रकरणी भूधारकाच्या हिश्याची किंमत रुपये ३१ कोटी ७३ लाख परिगणित करून त्यावर ४ टक्के दराने रूपये १ कोटी २७ लाख रूपये मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक असताना या प्रकरणी बाजारमुल्याची चुकीच्या पध्दतीने कमी परिगणना केल्याने शासनास महसुलापोटी मिळणारे मुद्रांक शुल्क जवळपास ८० लाख ७७ हजार रूपयांनी कमी आकारण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार चुकीच्या पध्दतीने बाजरमूल्य परिगणित करून शासनाच्या कोट्यवधी रूपयांच्या महसुलाचे नुकसान करणारे संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करून संबंधितांकडुन उर्वरीत मुद्रांक शुल्काची वसुली करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याचा तपशील काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) विषयाधीन प्रकरणी मा.महालेखाकार कार्यालयाचा लेखा आक्षेप प्राप्त झाल्यानंतर त्यानुषंगाने चुकविलेल्या मुद्रांक शुल्काची निश्चिती करण्याकरीता महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ३२ (अ) च्या तरतूदीनुसार संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे (शहर) यांचे कार्यालयामार्फत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. उक्त आदेशाने बाधीत झाल्याने संबंधित पक्षकाराने महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ५३ (१अ) खाली नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे तथा मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यांचेकडे अपील दाखल केले होते.

तथापि, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यांनी उक्त अपील अमान्य करुन संबंधित पक्षकाराला मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे (शहर) यांचे कलम ३२ (अ) खालील आदेशाप्रमाणे मुद्रांक शुल्क भरण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. त्यानुसार, मुद्रांक शुल्क वसुली करण्याकरीता महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ४६ नुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्नाधीन दस्त चुकीचे मुद्रांक शुल्क लावुन नोंदविला असल्याने संबंधित दुय्यम निबंधक यांना दस्तातील मुल्यांकन करताना अशा प्रकारे चुका होणार नाही याची दक्षता घ्यावी. अन्यथा कडक कार्यवाही करण्यात येईल अशी लेखी समज नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयामार्फत देण्यात आली आहे.

तथापि, महाराष्ट्र नोंदणी नियम, १९६१ च्या नियम ४४ नुसार नोंदणी करीता दाखल झालेला दस्त हा यथोचित मुद्रांकित आहे किंवा नाही? याबाबत दक्षता तथा खातरजमा करण्याची जबाबदारी ही संबंधित दुय्यम निबंधकावर निश्चित करण्यात आलेली आहे.

तसेच, महाराष्ट्र मुद्रांक (मिळकतीचे वास्तव बाजारमूल्य निर्धारित करणे) नियम, १९९५ च्या तरतूदीनुसार देखिल दस्तावरील मुद्रांक शुल्क निश्चिती करण्याच्या अनुषंगाने संबंधित दुय्यम निबंधक यांनी कार्यवाही पार पाडणे आवश्यक आहे.

सबब, विषयाधीन प्रकरणी संबंधित दुय्यम निबंधक यांनी जाणिवपुर्वक वर नमुद नियमांचे उल्लंघन करुन मुद्रांक शुल्काची कमी आकारणी केली किंवा कसे याबाबत नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयातील तपासणी पथकामार्फत चौकशी करण्यात येईल. उक्त चौकशीअंती निदर्शनास येणाऱ्या बाबीस अनुलक्षून संबंधित दुय्यम निबंधक यांचेसह उक्त दस्ताशी संबंधित इतर अधिकारी कर्मचारी यांचे विरुध्द महाराष्ट्र नागरीसेवा (वर्तणूक आणि शिस्त व अपील) नियमानुसार उचित कारवाई करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे-पानशेत रोड (ता.हवेली, जि.पुणे) येथील मौजे कुडजे गावाच्या हद्दीमध्ये अनधिकृत बांधकामे करण्यात येत असल्याबाबत

**(३०) * २०९०३ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-पानशेत रोड (ता.हवेली, जि.पुणे) मौजे कुडजे गावाच्या हद्दीमध्ये सुरु असलेल्या बांधकाम प्रकल्पात टेकड्या फोडून अनधिकृत बांधकामे करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे उल्लंघन करून बेकायदेशीरपणे परवानगीविना गौण खनिजाचे उत्खनन करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अनधिकृत बांधकामांना संबंधित प्रशासनाच्या अधिकाऱ्यांचे पाठबळ असून चुकीच्या बांधकामांमुळे शेजारील इमारतीचा सखल भाग पोखरून कामे सुरु असल्याने बाजूच्या रहिवासी भागाला धोका निर्माण झाला असल्याचे आढळून आले असतांनाही तहसिलदार व संबंधित प्रशासन कारवाई करत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुसार अनधिकृत बांधकाम करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे परसोडा, मासोद (ता.जि.अमरावती) येथील चौरसिया स्टोन क्रशरने गौण खनिजांचे उत्खनन केल्याबाबत

**(३१) * २१९९२ श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे परसोडा, मासोद (ता.जि.अमरावती) येथील चौरसिया स्टोन क्रशरने ई क्लास व खाजगी खदानी मधील परवानांप्रमाणे रॉयल्टी कमी भरून गौण खनिजांचे जास्त उत्खनन करुन शासनाच्या करोडो रुपयांच्या महसूलाचे नुकसान केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांच्याकडून तृतीय पक्षामार्फत चौकशी करून तसेच खदानीचे मोजमाप करुन अटी व शर्तीचे पालन न केलेल्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करून चारपट दंड वसूल करण्याबाबतचे पत्र लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ९ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना देऊन

याबाबत कार्यवाही करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) हे खरे नाही.
(२) लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी अमरावती यांना दिनांक ०९ डिसेंबर २०२० चे पत्र देऊन कार्यवाही करणेची मागणी केली आहे.
(३) लोकप्रतिनिधींच्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दिनांक १५.०१.२०२१ रोजीच्या पत्रान्वये तहसिलदार अमरावती व उप अधिक्षक भूमि अधिलेख अमरावती यांना खाणपट्ट्याची मोजणी करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) येथील एटीएम मल्टीट्रेड सर्व्हिसेस कंपनीकडून ठेवीदारांची केलेली फसवणूक

**(३२) * २१०४४ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण पश्चिम (जि.ठाणे) झोझवाला कॉम्प्लेक्स येथील एटीएम मल्टीट्रेड सर्व्हिसेस कंपनीने ठेवीदारांची सुमारे १ कोटी ७२ लाखांची फसवणूक केल्याबाबतचा गुन्हा महात्मा फुले पोलीस ठाण्यात दिनांक १९ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास नोंदविण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) कल्याण पश्चिम, झोझवाला कॉम्प्लेक्स येथील एटीएम मल्टीट्रेड सर्व्हिसेस या कंपनीने ठेवीदारांची रु. २,१०,३७,०००/- इतक्या रकमेची फसवणूक केल्याबाबत दिनांक १७.१२.२०२० रोजी महात्मा फुले पो.स्टे. गुन्हा रजि. नं. ६३०/२०२० भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ४६५, ४६७, ४६८, ३४ सह महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) व (३) सदर गुन्ह्याचे तपासात ठेवीदारांची एटीएम मल्टीट्रेड सर्व्हिसेस या कंपनीत पैसे गुंतविल्यास १८ महिन्यात दामदुप्पट करण्याचे आमिष दाखवून एकूण रु. २,१०,३७,०००/- इतक्या रकमेची फसवणूक केल्याचे आढळून आले असून आरोपी श्रीकांत गंगाधर राव व इतर ३ यांना अटक करण्यात आली आहे. सर्व अटक आरोपी यांचे राहते घराची पंचासमक्ष झडती घेण्यात आली असून, गुन्ह्याचे संदर्भातील महत्वाचे दस्तऐवज जप्त करण्यात आले आहेत. आरोपींचे बँक खात्याबाबत बँकेकडून माहिती घेऊन, अशी बँक खाती गोठविण्यात आली आहेत. तसेच आरोपी रेखा रामदास जाधव यांची रु. नं. ५०४, गौरीपाडा तलावाजवळ कल्याण (प.) ही स्थावर मालमत्ता व आरोपी सुनिल आव्हाड यांची रुम नं. ७०५ ए विंग, लेक कॉसल, मिलींदनगर, कल्याण प. ही मालमत्ता गुन्ह्याशी संलग्न करण्यात आली आहे. त्याबाबत पुढील अधिकचा तपास व आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात मोठया प्रमाणात बर्ड फ्लूचा प्रादुर्भाव वाढत असल्याबाबत

**(३३) * २०४९० श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.वैभव नाईक (कुडाळ), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील**

**(कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.फारूक शाह (धुळे शहर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.रावसाहेब अंतापूरकर (देगलूर), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.सदा सरवणकर (माहिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती मुक्ता टिळक (कसबापेठ), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्रीमती श्वेता महाले (चिखली), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.श्यामसुंदर शिंदे (लोहा) श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मोठ्या प्रमाणात बर्ड फ्लूचा प्रादुर्भाव झाला असून मुंबई, ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सोलापूर, अहमदनगर, परभणी, बीड, नांदेड, लातूर, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व अमरावती या जिल्ह्यांसह एकूण २२ जिल्ह्यांमध्ये कोंबडया, कावळे, चिमण्या, बदके, पाणबगळे, पोपट, पांढरे बगळे, गिधाडे इ. सात प्रजातीतील पक्षी मृतावस्थेत सापडले असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणी जिल्ह्यात तब्बल ९०० कोंबड्यांचा मृत्यू बर्ड फ्लूने झाल्याचे स्पष्ट झाले असून मुंबईसह ठाण्यात मृत्युमुखी पडलेले पाणबगळे, कबुतरे, कावळे व इतर पक्ष्यांचा मृत्यू बर्ड फ्लूने झाला असल्याचा अहवाल

प्रयोगशाळेने दिला असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बाधित पक्षांच्या संपर्कातून आणि उडत्या पक्षांच्या विष्ठेतून बर्ड फ्लूचा प्रादुर्भाव होत असल्याचे स्पष्ट झाले असून कफ, डायरिया, ताप, डोकेदुखी, स्नायुदुखी, पोट दुखणे, उलट्या, न्युमोनिया, गळ्याचा त्रास, सर्दी, अस्वस्थता व डोळ्यांचे इन्फेक्शन ही प्रमुख लक्षणे असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मृत पावलेले प्राणी व पक्ष्यांचे नमुने तपासणीसाठी भोपाळ व पुणे यथील प्रयोगशाळेत पाठविण्यात आले असून याबाबतचे अहवाल शासनास प्राप्त झाले आहेत काय, त्यात काय आढळून आले आहे,

(५) असल्यास, नुकसानग्रस्त व्यावसायिकांना नुकसान भरपाई देण्याचा निर्णय मा.पशुसंवर्धन मंत्री यांनी माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान घेतला असून नुकसान भरपाई देण्यासाठी व बर्ड फ्लू नियंत्रणात आणण्यासाठी सुमारे १३० लाख रुपयांची रक्कम मंजूर करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, त्यानुषंगाने नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्यासह बर्ड फ्लू या रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत शासनाने कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार :** (१) हे खरे असून राष्ट्रीय उच्च सुरक्षा पशुरोग संस्था, भोपाळ या संस्थेने राज्यातील एकूण २४ जिल्ह्यांतील कुक्कुट तसेच, इतर पक्षांमध्ये बर्ड फल्यू रोग झाल्याचे निदान केलेले आहे. विविध पक्षांच्या मर्तुकीमध्ये गिधाड पक्षाचा समावेश आढळून आलेला नाही.

(२) हे खरे आहे.

(३) बर्ड फल्यूचा प्रादुर्भाव पक्षांमध्ये झाल्याच्या घटना असून, राष्ट्रीय उच्च सुरक्षा पशुरोग संस्था, भोपाळ यांच्या अहवालानुसार देशामध्ये आजतागायत पक्षांपासून माणसांमध्ये बर्ड फल्यू रोगाचा संसर्ग झाल्याची नोंद आढळून आलेली नाही.

(४) मृत पावलेल्या पक्षांचे नमुने तपासणीसाठी पुणे येथील प्रयोगशाळेत पाठविण्यात आले असले तरीही, राष्ट्रीय स्तरावरील उच्च सुरक्षा पशुरोग संस्था, भोपाळ यांच्या अंतिम अहवालानुसारच रोग प्रादुर्भाव घोषित करण्यात

येतो. दिनांक २२.०२.२०२१ पर्यंत भोपाळ येथे पाठविण्यात आलेल्या एकूण १७५ रोग नमुन्यांपैकी ७४ रोग नमुने होकारार्थी आढळून आलेले आहेत.

(५) हे खरे असून बर्ड फ्ल्यू रोग नियंत्रण संदर्भात केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या सन २०२१ च्या सुधारित कृती आराखड्यानुसार बाधित केंद्रापासून १ कि.मी. त्रिज्येच्या परिसरातील जाणीवपूर्वक नष्ट केलेले कुक्कुट व इतर पक्षी, अंडी व पक्षी खाद्य याची नुकसानग्रस्त शेतकरी कुक्कुट व्यावसायिकांना भरपाई अदा करणे व रोग नियंत्रणात आणण्यासाठी ऑपरेशनल कॉस्ट या अंतर्गत केंद्र व राज्य हिश्याचा एकूण रू.३४०.६४ लक्ष निधी प्रत्यक्ष वितरित करण्यात आलेला आहे.

(६) नुकसानग्रस्तांना तातडीने आर्थिक मदत देण्यासह बर्ड फ्ल्यू या रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत केंद्र शासनाने बर्ड फ्ल्यू रोग नियंत्रणाच्या अनुषंगाने सन २०२१ मध्ये निर्गमित केलेल्या सुधारित कृती आराखड्यानुसार शासनाने प्रतिबंधात्मक उपाययोजना केलेली असल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना “मागेल त्याला शेततळे” या योजनेचे अनुदान मिळण्याबाबत

**(३४) * २०९४६ श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी “मागेल त्याला शेततळे” या शासनाच्या योजनेनुसार सन २०१६-१७ ते २०१९-२० या कालावधीत शेततळ्यांची कामे पूर्ण करुन अनुदान मिळण्यासाठी शासनाकडे रितसर सेवा शुल्क भरुन अर्ज सादर केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कालावधीत ३ हजार ५१९ शेततळ्यांची कामे पूर्ण झालेली असतांना त्यापैकी ३ हजार २७२ शेततळ्यांच्या कामांचे १५ कोटी ५६ लाख २५ हजार इतके अनुदान शेतकऱ्यांना वितरित करण्यात आले असले तरी अद्यापी २४७ शेततळ्यांचे अनुदान आले नसल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पात्र शेतकऱ्यांना अनुदान वितरित करण्यासाठी निधीची मागणी शासनाकडे करण्यात आली असून, निधी प्राप्त होताच अनुदान वितरित करण्यात येईल असे उपविभागीय कृषी अधिकारी, परभणी यांचेकडून निदर्शनास आणण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित शेतकऱ्यांना प्रलंबित अनुदाची रक्कम वितरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१), (२) व (३) होय, हे अंशतः खरे आहे.
(४) अनुदान उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महापे (नवी मुंबई) येथे अत्याधुनिक सायबर प्रयोगशाळा उभारण्याबाबत**

**(३५) * २२६६२ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सायबर गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असून मागील पाच वर्षांच्या कालावधीत जवळपास सोळा हजार पेक्षा जास्त सायबर गुन्ह्यांची नोंद झाली आहे, त्यापैकी फक्त साडेचार हजार गुन्ह्यांची उकल झाल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी महापे, नवी मुंबई येथे अत्याधुनिक सायबर प्रयोगशाळा उभारण्यात येणार असून सदर प्रयोगशाळेसाठी सुमारे ९१५ कोटी रुपये खर्च करण्याचा प्रस्ताव तसेच सायबर सुरक्षेविषयीचा कायदा करण्याविषयीची बाब शासनाच्या विचारधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ठिकाणी अद्ययावत प्रयोगशाळा उभारण्यासाठी आतापर्यंत किती निधी उपलब्ध करण्यात आला आहे व या प्रयोगशाळेची सद्य:स्थिती काय

आहे, तसेच सायबर सुरक्षेविषयीचा कायदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) हे खरे आहे.

संपुर्ण राज्यात मागील पाच वर्षांत एकुण १९,७७५ इतक्या गुन्ह्यांची नोंद झाली आहे. त्यापैकी ४,७३६ इतक्या गुन्ह्यांची उकल झाली आहे.

(२) व (३) नवी मुंबईतील महापे येथे महाराष्ट्र सायबर प्रकल्पाकरीता मिलेनीयम बिझनेस पार्क ही इमारत घेण्यात आली आहे. महाराष्ट्र सायबर करीता रु.८३७,८६,०७,३५०/- कोटीच्या प्रकल्पास मान्यता देण्यात आली असून त्यात TAIC, TAPAC, CERT-MH, DC-DR, CoE, SOC या बाबींचा समावेश आहे.

सायबर गुन्ह्यांवर प्रभावी आळा घालण्यासाठी केंद्र शासनाने माहिती तंत्रज्ञान कायदा, २००५ अन्वये शिक्षेच्या तरतुदी केल्या आहेत.

सायबर सुरक्षेविषयीचा कायदा करण्याची बाब राज्य शासन स्तरावर सद्यस्थितीत विचाराधीन नाही.

मिलेनीयम बिझनेस पार्क, महापे नवी मुंबई या इमारतीच्या हस्तांतरणाकरीता रु.२९,२८,५९,७२०/- इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे. सदर इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले असून, इमारत सुव्यवस्थित करण्याकरीता रु.४५,८३,९१,९२५/- निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईमध्ये मुलींच्या अपहरणात होत असलेली वाढ

**(३६) * २०४७४ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत मागील ११ महिन्यांत ७०८ मुलींच्या अपहरणाच्या गुन्ह्यांची नोंद करण्यात आल्याची माहिती माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी ५८२ मुलींचा शोध घेण्यास पोलिसांना यश आले असून १२६ मुलींचा शोध अद्‌याप घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मुलींचा शोध तातडीने घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) बृहन्मुंबई क्षेत्रात दिनांक ०१.०१.२०२० ते ३१.१२.२०२० पर्यंत एकूण ८८९ मुलींचे अपहरण झाले आहे.

(२) एकूण ८८९ मुलींपैकी ८०८ मुलींचा शोध घेण्यात आला असून ८१ मुलींचा शोध घेण्याचे काम सुरु आहे.

(३) दिनांक १५.०२.२०१८ रोजीच्या विशेष पोलीस परिपत्रकातील परिच्छेद क्र. २६/२०१८ प्रमाणे हरविलेल्या व्यक्तीचा शोध घेण्यासाठी प्रमाणित कार्यपध्दती तयार करण्यात आली असून ती अंमलबजावणीसाठी सर्व परिमंडळातील उपआयुक्त यांना वितरीत करण्यात आली आहे. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे सूचना दिलेल्या आहेत :-

१) हरविलेल्या व्यक्ती संबंधीच्या शोध पथकाचे नियंत्रण वरीष्ठ पोलीस निरीक्षक व पोलीस निरीक्षक (प्रशा) यांचे अधिपत्याखाली असून सहा. पोलीस आयुक्त व परि. पोलीस उपाअयुक्त भेटीच्या दरम्यान पर्यवेक्षण व मार्गदर्शन करुन आढावा घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

२) हरविलेल्या व्यक्तींची नोंद ही परिपूर्ण असणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे तशा सूचना दिलेल्या आहेत.

३) हरविलेल्या व्यक्तींची माहिती व फोटो तात्काळ दूरचित्रवाणी व मुंबई पोलीस वेबसाईटवर प्रसारित होण्याकरीता यासंदर्भाचे केंद्र गु.शा., गु.अ.वि., मुंबई येथे पाठविण्यात येते.

४) एन.सी.आर.व्ही. व सी.सी.टी. एन.एस. या संगणक प्रणालीमध्ये वरील माहिती वेळोवेळी अद्‌यावत करण्यात येते.

५) हरविलेल्या व्यक्तींचे केंद्र गुन्हे शाखा हे प्रत्येक पोलीस ठाणेशी समन्वय साधून काम करतात.

६) त्वरीत शोध घेण्याकरीता हरविलेल्या व्यक्तींचे केंद्र व पोलीस ठाणे यांचे माहितीचे त्वरीत देवाण-घेवाण होण्याकरीता व्हॉटसअॅप ग्रुप मुंबई करीता तयार केलेला आहे.

७) पोलीस परिपत्रकातील प्रमाणित कार्यपध्दतीच्या आदेशानुसार सर्व पोलीस ठाण्यातील या पथकातील संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्या कार्यशाळा आयोजित करण्यात येतात.

वरील प्रमाणित कार्यपध्दतीचे पालन हे बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाकडून प्रभावीपणे चालू असून हरविलेले मुले / मुली / महिला / वयस्कर महिला व पुरुष यांचा तत्परतेने शोध घेण्यात येतो.

तसेच केंद्र / महाराष्ट्र शासन यांचे आदेशाने मुंबईतील सर्व पोलीस ठाण्यात हरविलेल्या लहान मुलांचा शोध घेऊन त्यांना त्यांच्या कुटुंबियांकडे देण्याकरीता ऑपरेशन मुस्कान सारख्या शोध मोहिम राबविण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे सय्यद पिंप्रि (ता.जि.नाशिक) येथे तालुकास्तरीय क्रिडा संकुल उभारण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३७) * २३०३९ श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सय्यद पिंप्रि (ता.जि.नाशिक) येथे ग्रामपंचायत क्षेत्रात अतिरिक्त १० ते १२ एकर जागा उपलब्ध असून तेथे क्रिडा संकुल विकसित करण्याच्या दृष्टीने क्रिकेट मैदान, पॅव्हेलियन बांधकाम व अन्य तद्नुषंगिक कामे करण्यासाठी सुमारे १२ कोटी २० लक्ष इतका खर्च अपेक्षित असून मागील अनेक वर्षापासून तालुकास्तरीय क्रिडा संकुल बांधण्याबाबत नागरिक शासनाकडे सातत्याने मागणी करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार सदर क्रिडा संकुल उभारणीबाबतचा प्रस्ताव प्रधान सचिव, क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई, आयुक्त, क्रिडा व युवक सेवा, पुणे तसेच

मा.क्रिडा मंत्री यांना दिनांक २१ जानेवारी, २०२० व दिनांक १० फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास सादर करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी, देवळाली (नाशिक) यांनी देखील या क्रिडा संकुलास आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचे निवेदन आयुक्त, क्रिडा व युवक सेवा, पुणे तसेच मा.क्रिडा मंत्री, यांना माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू तालुकास्तरीय क्रिडा संकुल उभारणीकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार :** (१) तालुका क्रीडा संकुल, नाशिक हे मौजे सय्यद पिंप्री येथे तालुका क्रीडा संकुल उभारण्यात आले आहे. त्यालगत असलेल्या जागेवर अतिरिक्त क्रीडा सुविधा उभारण्याबाबत मागणी आहे.

(२) तालुका क्रीडा संकुलालगतच्या जागेवर अतिरिक्त क्रीडा सुविधा उपलब्ध करण्याचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

(३) तालुका क्रीडा संकुल, नाशिक लगतच्या जागेवर अतिरिक्त क्रीडा सुविधा उपलब्ध करण्याबाबत लोकप्रतिनिधींचे दिनांक २१.०१.२०२० व दिनांक १०.०२.२०२१ चे निवेदन प्राप्त झाले आहे.

(४) तालुका क्रीडा संकुल, नाशिक यासाठी रु. १००.०० लक्ष निधी वितरीत केला असून त्यातून मुख्य पॅव्हेलियन इमारत, इनडोअर गेम हॉल, व्यायामशाळा, प्रशासकीय इमारत, चेंजींग रूम, प्रसाधनगृह, व्हीआयपी प्रेक्षक गॅलरी, क्रिकेटचे मैदान इ. सुविधा उपलब्ध केल्या आहेत. अतिरिक्त क्रीडा सुविधांबाबतचा प्रस्ताव तपासण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यामधील रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहिरींचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(३८) * २०६०६ श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील ९४ आदिवासी शेतकऱ्यांनी मागील दोन वर्षांपासून रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहिरींचे प्रस्ताव दाखल केलेले असताना त्यातील ३० शेतकऱ्यांचे दोन वर्षांपासून प्रलंबित असलेले प्रस्ताव पंचायत समिती कार्यालय, विक्रमगड जिल्हापरिषद, पालघर स्तरावर मंजुरी न देताच कार्यवाहीत अडकले असल्याचे दिनांक १ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी संबंधित शेतकऱ्यांनी पालघर जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (रोहयो), प्रधान सचिव, रोहयो, मा.पालक मंत्री, पालघर जिल्हा व मा.रोजगार हमी मंत्री यांना अनेकदा तक्रारी करुनही अद्याप कार्यवाही झाली नसल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनस्तरावर चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार सदरहू प्रस्ताव मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्राप्त प्रस्तावांमध्ये त्रुटी असल्याने सदर त्रुटी पुर्तता करुन परिपूर्ण

प्रस्ताव सादर करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, विक्रमगड यांना कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**परभणी जिल्ह्यात भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेंतर्गतचे लाभार्थी अनुदानापासून वंचित राहिले असल्याबाबत**

**(३९) * २३१५३ श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यात भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेंतर्गत सुमारे १३२ लाभार्थी अनुदानापासून वंचित राहिले असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त लाभार्थ्यांच्या अनुदानाचा एकूण ४० लाख रुपये निधीचा प्रस्ताव कृषी विभागाकडे पाठविण्यात आला असतानाही त्यास शासनाकडून मान्यता मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावाला मान्यता देवून वंचित राहिलेल्या लाभार्थ्यांना त्यांचे थकीत अनुदान तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**गोंदिया जिल्ह्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील कामांमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(४०) * २०८७३ श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमधील २०३ कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अर्जुनी मोरगांव, गोरेगांव, आमगांव, देवरी, सडक अर्जुनी, (जि.गोंदिया) या पाच तालुक्यांमध्ये सन २०१७-१८ या कालावधीत सदर योजनेतील कामांमध्ये गैरव्यवहार झालेला असून जिल्हाधिकारी, गोंदिया यांच्या चौकशीत १२ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय वा चौकशीमध्ये काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार या गैरव्यवहारातील संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे अंशत: खरे आहे.

मनरेगा अंतर्गत वन विभागाच्या देवरी तालुक्यातील कामांमध्ये काही त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

(२), (३), (४) व (५) सदर प्रकरणी वन विभागाच्या नरेगा अंतर्गत कामांमध्ये काही त्रुटी आढळून आल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापित करण्यात आली आहे. समितीचा अहवाल अदयापी अप्राप्त आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## पेण (जि.रायगड) येथे तीन वर्षीय बालिकेवर बलात्कार करुन तिची हत्या केल्याबाबत

**(४१) * २०५६७ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.पराग शाह (घाटकोपर**

**पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राम सातपुते (माळशिरस), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) येथील पांचोळा या आदिवासी लोकवस्तीमधील तीन वर्षीय बालिकेला तिच्या घरातून नेवून तिच्यावर बलात्कार करुन हत्या केल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी एका ३४ वर्षीय व्यक्तीस अटक करण्यात आली असून आरोपीवर अपहरण, बलात्कार, निर्घृण हत्या, पोक्सो व ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरोपीवर कारवाई होण्याच्या दृष्टीने सदरहू खटला जलदगती न्यायालयात चालविण्यासंदर्भातील निर्णयासह मुलीच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) होय.

(२) व (३) सदर प्रकरणी आरोपीविरूध्द भा.दं.वि.सं. कलम ३७६(I)(J), ३७६अ, ३७६अब, ३७७, ४५२, ४५५, ३६३, ३६६(अ), ४४८, ३०२, २०१, ४५०, ७५ सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ४, ५(जे)(४), ५(एम), ६, ८, १२ सह अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ सुधारणा अधिनियम २०१५ चे कलम ३(१)(w)(i)(ii), ३(२)(v) अन्वये गु.र.क्र. १६८/२०२० असा गुन्हा दाखल केला आहे. प्रकरणातील आरोपीस अटक करण्यात आली असून, दिनांक ०८.०२.२०२१ पर्यंत पोलीस कोठडी व तद्नंतर न्यायालयीन कोठडी मिळालेली आहे. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने दिनांक २८.०१.२०२१ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून, विशेष सरकारी वकील म्हणून श्री.उज्ज्वल निकम यांची नेमणूक करण्याबाबत व प्रकरण जलदगती न्यायालयात चालविण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

सदरहू प्रकरणी पिडीतेच्या वडीलांना रू. ४,१२,५००/- इतके अर्थसहाय्य दिनांक ०५.०१.२०२१ रोजी अदा करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मांजरी (जि.पुणे) येथील सीरम इन्स्टिट्युटच्या इमारतीला लागलेल्या आगीबाबत

**(४२) * २२२४९ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.रावसाहेब अंतापूरकर (देगलूर), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना संसर्गावरील लसमुळे सध्या केंद्रस्थानी असलेल्या सीरम इन्स्टिट्युटच्या इमारतीला दिनांक २१ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास भीषण आग लागून झालेल्या दुर्घटनेत पाच जणांचा होरपळून मृत्यू झाला असून अनेकजण गंभीररित्या जखमी झाले तर कोट्यवधी रकमेच्या मालमत्तेचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दुर्घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, त्यानुसार सदरहू आगीस जबाबदार असलेल्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना व जखमी झालेल्या व्यक्तींना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी पाच व्यक्तींचा मृत्यू झाला आहे. याव्यतिरिक्त कोणीही जखमी नाही.

(२) व (३) सीरम इन्स्टिटयुटमध्ये लागलेल्या आगीबाबत हडपसर (पुणे) पोलीस स्टेशन येथे जळीत रजिस्टर नं. ३/२०२१ अन्वये नोंद करण्यात आली आहे. सदर प्रकरणाचा तपास सुरू आहे. सदर दुर्घटना नैसर्गिक आपत्ती नसल्याने शासनामार्फत मदत देण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपाडा व मालवणी (मुंबई) येथे पोलिसांनी छापा टाकून गुटखा जप्त केल्याबाबत

**(४३) * २०९१४ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपाडा (मुंबई) येथील नारळ गल्लीतील गोदामात, मुंबई पोलिसांच्या गुन्हेगारी गुप्तवार्ता पथकाने (सीआययू) दिनांक २ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास छापा टाकून सव्वा कोटी रुपयांचा गुटखा जप्त केला, हे खरे आहे काय,

(२) तसेच मालवणी (मुंबई) परिसरातील राठोडी गावात अवैध गुटखा विक्री करणाऱ्या ठिकाणावर दिनांक ८ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास पोलीस परिमंडळ-११ च्या पोलीस पथकाने छापा घालून साडे चार लाखांचा गुटखा जप्त केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले,

(४) असल्यास, तद्नुसार संबंधितांवर कारवाई करण्यासह गुटख्याची होणारी तस्करी रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) हे खरे आहे.

दिनांक ०१.०१.२०२१ रोजी गोपनीय माहितीच्या आधारे गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक,मुंबई यांच्यासमवेत अन्न व औषध प्रशासन, बृहन्मुंबई विभाग, परिमंडळ-०२ मधील अन्न सुरक्षा अधिकारी यांनी १) गाळा नं.५८ ए वरील पहिला माळा, नारीयल गल्ली, भारत बाजार, छोटा सोनापूर नागपाडा, मुंबई -४०० ००८ २) गाळा नं.७५ वरील पहिला माळा, नारीयल गल्ली, भारत बाजार, छोटा सोनापूर नागपाडा, मुंबई -४०० ००८ येथे धाड टाकून १,२२,२६,३८०/- किंमतीचा प्रतिबंधीत अन्न पदार्थाचा साठा जप्त केलेला आहे. सदर छाप्यामध्ये ६ जणांना अटक करण्यात आलेली आहे. तसेच सदर धाडीमध्ये सफर गुटखा,रजनीगंधा, एसजीआर गुटखा, नजर गुटखा, किंग विमल पानमसाला, मिडीयम विमल पानमसाला, रजनीगंधा फ्लेवर पानमसाला, शुद्ध प्लस पानमसाला, लाल गोवा गुटखा, राजश्री पान मसाला, हरा गोवा असे प्रतिबंधित अन्न पदार्थाचे ११ अनौपचारिक नमुने घेण्यात आलेले आहेत. सदर ११ अनौपचारिक नमुने विश्लेषणाकरिता अन्न विश्लेषक, अन्न चाचणी प्रयोगशाळा, मुंबई यथे पाठविण्यात आलेले आहेत. सदर नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्रलंबित आहेत.

(२) मालवणी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१५/२०२१ नुसार दिनांक ६.०१.२०२१ रोजी रोठाडी गाव, मालवणी, मालाड (प.) या ठिकाणी प्रतिबंधित केलेला गुटखा, पानमसाला या पदार्थांची विक्री करण्यासाठी साठवणूक केल्याचे आढळून आल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात रु.४,५५,०००/- चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

(३) नागपाडा प्रकरणी चौकशी चालू असून या प्रकरणात सहा जणांनी अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ चे कलम २६(२)(i), २६(२)(iv) सह कलम २७(३)(e), २७(३)(d), ३(i) (zz) (v) व कलम ३०(२) (a) अन्वये अन्न सुरक्षा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांची शासन राजपत्र अधिसूचना क्र.असुमाअ/अधिसुचना-३६९/७, दिनांक २०.०७.२०२० चे उल्लंघन केल्यामुळे कलम ५९ नुसार शिक्षेस पात्र आहे. तसेच लोकसेवकाने जनतेच्या आरोग्याच्या हितासाठी जारी केलेल्या आदेशाचे उल्लंघन केलेले असल्यामुळे भारतीय दंड विधान कलम ३२८, २७२, २७३, १८८, १७९, ३४ चे उल्लंघन केले असल्यामुळे त्यांच्याविरुध्द नागपाडा पोलीस ठाणे

येथे गु.र.क्र. क्र.०१/२०२१ नुसार दिनांक ०२.०१.२०२१ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तसेच मालवणी प्रकरणी मालवणी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १५/२०२१ कलम ३२८,२७२,२७३, भादंवि सह अन्न व सुरक्षा कायदे ३(e)(z)(२)(v) अन्वये दिनांक ०६.०१.२०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात २ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हे तपासाधीन आहेत.

(४) महाराष्ट्र राज्यात तंबाखुजन्य पदार्थ तसेच गुटखा बंदी असतानाही परराज्यातून महाराष्ट्र राज्यात येणा-या प्रतिबंधित अन्न पदार्थाचे बाबत प्राप्त गोपनीय माहितीच्या आधारे धाडी टाकून प्रतिबंधित अन्न पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. अन्न व औषध प्रशासन, बृहन्मुंबई यांच्यामार्फत प्रतिबंधित अन्न पदार्थ विक्रीस आळा घालण्यासाठी नियमितपणे धाडींचे आयोजन करण्यात येत असते.

तसेच गुटखा, पान मसाला, सुगंधित तंबाखू/सुपारी, खर्रा, मावा या प्रतिबंधित अन्न पदार्थाच्या बंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता भा.दं.वि. कलम १८८, २७२, २७३ व ३२८ या कलमांतर्गत स्वतंत्र कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत तसेच प्रतिबंधित अन्न पदार्थाच्या प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता कायदेशीर कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासन विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाकडून पोलीस बंदोबस्ताची मागणी केल्यास, आवश्यक तो पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन देण्याबाबत सर्व पोलीस ठाणे अंमलदार/ शाखा प्रमुख यांना विशेष पोलीस महानिरिक्षक (कायदा व सुव्यवस्था), पोलीस महासंचालक कार्यालय यांनी दिनांक १६.०७.२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये सूचना दिलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद जिल्ह्यात महाबीज कंपनीने भेसळयुक्त बियाणांचे वाटप केल्याबाबत

**(४४) * २३६४९ डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यात बियाणांचे उत्पादन करणाऱ्या महाबीज या निमशासकीय कंपनीकडून भेसळयुक्त बियाणांचे वाटप शेतकऱ्यांना करण्यात आल्याचे दिनांक ९ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यात एकूण १९३४ बीजोत्पादनपैकी ९० बीजोत्पादन शेतकऱ्यांच्या सोयाबीन बियाण्यांमध्ये भेसळ आढळून आली असून त्याचे क्षेत्र २४० हेक्टर आहे अशा प्रकारचा अहवाल गुणनियंत्रण अधिकारी, उस्मानाबाद यांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालाच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासह भेसळयुक्त बियाणांचे वाटप करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हवेली (जि.पुणे) तालुक्यात कृषी विभागाच्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(४५) * २१०१४ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली (जि.पुणे) तालुक्यामधील कृषी विभागाच्या शेडनेट, पॉली हाऊस, नाला खोलीकरण व रुंदीकरण या कामांमध्ये कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## एक्सपॅट प्रोजेक्ट्स अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट प्रा.लि. या कंपनीने गुंतवणूकदारांची केलेली आर्थिक फसवणूक

**(४६) * २०५९६ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एक्सपॅट प्रोजेक्ट्स अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट प्रा.लि. या कंपनीने ७००० गुंतवणूकदारांची सुमारे ७०० कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी फसवणूकीचा गुन्हा नोंद होऊन अनेक महिने झाले असताना उपरोक्त कंपनीच्या मालकांना अटक करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार दोषींवर तातडीने कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) एक्सपॅट प्रोजेक्टस अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट प्रा.लि. या कंपनीने ४०८ गुंतवणुकदारांच्या रु. ६१,३४,८८,१३३/- इतक्या रकमेची फसवणूक झाल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.
(२) व (३) विनोबा भावे नगर पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. २२१/२०, दिनांक ०७.१०.२०२० रोजी दाखल करुन आर्थिक गुन्हे विभाग मुंबई येथे गु.र.क्र. ३१/२०२० अन्वये पुढील तपास सुरु आहे. सदर गुन्ह्याची व्याप्ती मोठी असून चौकशी करुन आरोपींना अटक करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. एकूण ४०८ गुंतवणूकदारांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच इतरही

गुंतवणूकदारांच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. आरोपी विरुध्द दखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आलेला असून आरोपींची बँक खाती व मालमत्ता यावर टाच आणली असून आरोपी / संचालकांची बँक खाती व इतर मालमत्तांचा शोध घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डहाणू (जि.पालघर) तालुक्यात उभारण्यात येणारे वाढवण बंदर रद्द करण्याबाबत

**(४७) * २०६२४ श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यात वाढवण बंदर उभारण्याची घोषणा केंद्र शासनाने केली असल्यामुळे तेथील मच्छीमार, शेतकरी, डायमेकर तसेच माश्यांचा गोल्डन बेल्ड व जैवविविधतेची मोठ्या प्रमाणात हानी होणार असल्याने तेथील नागरिकांनी या बंदराला विरोध केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक ग्रामस्थ नागरीकांचा विरोध तसेच सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असताना बंदराच्या उभारणीच्या प्रक्रियेला सुरुवात करण्यात आल्याचे दिनांक ८ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाढवण बंदराच्या विरोधात संघर्ष समिती व मच्छिमार संघटना यांच्या शिष्टमंडळाने मा.मुख्यमंत्री यांची भेट घेऊन हे बंदर रद्द करण्यात यावे, तसेच डहाणू तालुका पर्यावरण प्राधिकरण कायम ठेवण्याची मागणी दिनांक ३ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) यासंदर्भात वाढवण बंदर विरोधी संघर्ष समिती व महाराष्ट्र मच्छिमार कृती समिती यांची निवेदने शासनास प्राप्त झाली आहेत.
(४) व (५) वाढवण बंदर हे मोठे बंदर म्हणून जेएनपीटी यांच्यामार्फत विकसित करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे. केंद्र शासनाने दिनांक १९/०२/२०२० च्या अधिसुचने अन्वये वाढवण बंदर हे मोठे बंदर म्हणून घोषित केले आहे. प्रस्तावित वाढवण बंदर हे मोठे बंदर (Major Port) म्हणून विकसित होणार असल्याने हा प्रकल्प केंद्र शासनाचे अखत्यारीत आहे. प्रकल्प आराखडा, डहाणू तालुका पर्यावरण संरक्षण प्राधिकरण (DTEPA) यांचे निर्णय व अहवालांमधील निष्कर्षांचा अभ्यास करुन बंदर प्रकल्पाबाबत योग्य त्या सहमती अंती निर्णय केंद्र शासनाचे अखत्यारीत आहे.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील लाभार्थी शेतकऱ्यांना राष्ट्रीय फलोत्पादन कार्यक्रमांतर्गत प्रलंबित अनुदान मिळण्याबाबत

**(४८) * २०५७० अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील राष्ट्रीय फलोत्पादन कार्यक्रमांतर्गत राज्य शासनाच्या कृषी विभागाच्यावतीने मागासवर्गीय शेतक-यांसाठी लागू असलेल्या सामूहिक शेततलाव योजनेतून लाभ घेतलेल्या व शासनाच्या आराखडयानुसार काम पूर्ण केलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील शेतक-यांचे अनुदान मागील एक वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्वसंमती घेऊन माहे जानेवारी व फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यानच्या महिन्यांत सर्व शेतकऱ्यांनी काम पूर्ण केले असून काम पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्षात उमदी (ता.जत) व सांगली जिल्ह्यातील संबंधित अधिकारी यांनी पूर्ण झालेल्या कामाचे जिओ टॅगिंग व मूल्यांकन केलेले असताना संबंधित लाभार्थ्यांनी जिल्हा व तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे वारंवार मागणी करुनही अनुदान मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदरहू शेततळ्यांचे अनुदान संबंधीत लाभार्थ्यांना अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत सांगली जिल्ह्यास सन २०१९-२० मध्ये सामुहिक शेततळे या बाबींसाठी अनुसुचित जाती प्रवर्गाकरिता स्पील ओव्हर कार्यक्रम रु. १५४.७५ लाख व नवीन कार्यक्रम रु.९०.०० लाख असा एकूण रु.२४४.७५ लाख रक्कमेचा आराखडा मंजूर आहे. त्यासाठी दिनांक ३१.०३.२०२० अखेर रु. २००.८५ लाख खर्च केला आहे. परंतु, सांगली जिल्ह्याने सन २०१९-२० च्या मंजूर कार्यक्रमापेक्षा रुपये १२६.३७ लाखाचे जादाचे दायित्व निर्माण केल्यामुळे सन २०१९-२० च्या मंजूर कार्यक्रमातील उर्वरित शिल्लक कार्यक्रम रु.४३.९० लाख व जादा दायित्वाचे रु.१२६.३७ लाख असा एकूण रुपये १७०.२७ लाख रक्कमेचा कार्यक्रम मंडळ कार्यालयास सादर केला. तसेच सदरची कामे सन २०२०-२१ मध्ये पूर्ण केली. रुपये १७०.२७ लाख रक्कमेच्या कार्यक्रमापैकी रु.६६.०९ लाख एवढी रक्कम अनुसुचित जाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना वितरित करण्यात आली आहे. उमदी, ता. जत येथील एका लाभार्थ्यासह

सांगली जिल्ह्यातील अनुसुचित जाती प्रवर्गातील एकूण ४३ लाभार्थ्यांच्या कामाचे मुल्यांकन व जिओ टॅगिंग पूर्ण करुन रु.१०४.५० लाख अनुदान मागणीचे प्रस्ताव मंडळ कार्यालयास प्राप्त झाले आहेत.

(३) एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान योजनेंतर्गत अनुसुचित जाती प्रवर्गाकरिता सन २०२०-२१ करिता पहिल्या हप्त्यापोटी मंजूर केंद्र हिस्सा व त्यासमरुप राज्य हिस्सा असा एकूण रु. ५.५८३३ कोटी इतका निधी वितरणास मान्यता देण्याची विनंती सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत वित्त विभागास करण्यात आली आहे. वित्त विभागाच्या मान्यतेनंतर निधी वितरित करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**

**मुंबई.** **सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.